**गोपनीय**

**क्रमांक : का.स./बैठक/२७३**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : १३.०३.२०२३

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी झालेल्या २७३व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

१३/३/२०२३
**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई – ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बांठिया<br>समर्थ अंगण, बिल्डींग-३A,<br>पु.ल.देशपांडे रोड, मिल्लत नगर,<br>अंधेरी –पश्चिम,<br>मुंबई – ४०० ०५३ | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, मुंबई – ४०० ०२१. | - | सदस्य |
| महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |
| प्रशासक<br>बृहन्मुंबई महानगरपालिका,<br>मुंबई – ४०० ००१. | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई – ४०० ०३२. | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई – ४०० ०३२. | - | सदस्य |

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई – ४०० ०२१.

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव, (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२.

प्रधान सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

*****

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २७३व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | : | **१६ फेब्रुवारी, २०२३ (गुरूवार)** |
| **वेळ** | : | **सकाळी १०.०० वाजता** |
| **स्थळ** | : | **मा. मुख्य सचिव यांचे समिती कक्ष<br>६वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई – ४०० ०३२.<br>(प्रत्यक्ष व दूरचित्रसंवादाद्वारे)** |

**उपस्थित सदस्य:**

| | | |
|---|---|---|
| श्री. मनु कुमार श्रीवास्तव<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बाँठिया | - | सदस्य |
| श्री. भूषण गगराणी<br>अपर मुख्य सचिव (१)<br>नगर विकास विभाग<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री. एस. व्हि.आर. श्रीनिवास<br>महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित:**

श्री. ओ.पी.गुप्ता
अपर मुख्य सचिव (व्यय) ,
वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

डॉ. के.एच.गोविंद राज
अतिरिक्त महानगर आयुक्त (१)
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. अश्विन मुद्गल
अतिरिक्त महानगर आयुक्त (२)
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. प्रमोद आहुजा
संचालक (कामे),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. अंकुश नवले
वित्तीय सल्लागार
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. प्रदीप यादव,
प्रमुख,
नगर रचना/नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. डी.एल.एन.मुर्ती,
प्रमुख,
परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. ए.पी. नागरगोजे,
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. प्रकाश भांगरे
मुख्य अभियंता (अ.का.),
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. चंदन शिरसाट
सचिव, कार्यकारी समिती (अ.का.)

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत व अभिनंदन केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या २७२व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या २७२व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यकारी समितीने कार्यवाही अहवालाची नोंद घेतली.

**बाब क्र. ३:** **<u>मेट्रो मार्ग ७ वरील गोरेगाव (पूरव) मेट्रो स्टेशन ते राम मंदिर रेल्वे स्टेशन पर्यंत पादचारी पुलाच्या बांधकामाच्या अंमलबजावणीकरिता कंत्राटदाराच्या नियुक्तीबाबत.</u>**

३.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मेट्रो स्थानकांवरील प्रवेश व निकास सुलभ करण्यासाठी प्राधिकरणाने मुंबई मेट्रो मार्ग २अ आणि ७ यांच्या मेट्रो स्थानकांवर बहु वाहतूक परिवहन एकत्रिकरणाची (Multi Modal Integration-MMI) योजना तयार केली आहे. बहु-वाहतूक परिवहन एकत्रिकरणाच्या संरेखनात मेट्रो पादचारी पुल आणि स्थानक-परिसरातील रहदारी सुधार-योजना इत्यादी विविध योजना आखल्या आहेत. स्टेशन क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी तसेच दैनंदिन प्रवासी संख्या (Daily Ridership) वाढविण्याच्या दृष्टीने, मेट्रो प्रवाशांच्या सोयीसाठी पादचारी पुलाची (FOB) योजना तयार केली आहे. मेट्रो-मार्ग-७, पश्चिम द्रुतगती महामार्गालगत अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) पर्यंत आहे. मेट्रो-मार्ग- ७ च्या प्रवाशांच्या विलगीकरणासाठीही पादचारी पुलाची आवश्यकता आहे. मेट्रो- मार्ग ७ या मार्गातील पादचारी पुलांच्या अंमलबजावणीसाठी प्राधिकरणाच्या निधीमधून रु. २१०.७१ कोटी खर्च करण्यासाठी प्राधिकरणाच्या १५१ व्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे.

३.२ पुढे असे सांगितले केले की, मेट्रो आणि उपनगरीय रेल्वे स्थानकास पादचारी पूलांच्या रूपात कनेक्टिव्हिटी असल्यास लोकांना रस्त्यावर जाण्याची गरज नाही. उपनगरीय रेल्वे स्थानकापासून सर्वात जवळच्या मेट्रो स्थानकात जाण्याचा रस्ता टाळत ते हा पादचारी पूल घेऊ शकतात आणि मेट्रो स्थानकात पोहोचू शकतात, शिवाय, हे रस्त्यांवरील पादचाऱ्यांचे अपघातात टाळण्यास देखील मदत करेल. ह्या पादचारी पुलाच्या जोडणीमुळे मेट्रोच्या प्रवासी संख्या वाढण्यास मदत होईल. मेट्रो मार्ग ७ चे गोरेगाव पूर्व मेट्रो स्थानक हे राममंदीर ह्या उपनगरीय रेल्वे स्थानकाला पादचारी पुलामार्फत जोडल्यानंतर उपनगरीय रेल्वेच्या तसेच मेट्रो मार्ग ७ च्या प्रवाशांना मार्ग बदली करुन मेट्रो तसेच उपनगरीय रेल्वे या दोन्ही मार्गांचा वापर करुन प्रवास करणे सोयीचे होईल. या अनुषंगाने, गोरेगाव पूर्व मेट्रो हे स्थानक राममंदीर ह्या उपनगरीय रेल्वे स्थानकाला पादचारी पुलामार्फत (Foot Over Bridge) जोडण्याचे प्रस्तावित आहे. तसेच गोरेगाव पूर्व मेट्रो स्टेशन ते राम मंदिर रेल्वे स्टेशन पर्यंत या पादचारी पूलांची जोडणी ही मेट्रो स्थानकांपासून राम मंदिर रेल्वे स्टेशन पर्यंत सुमारे ६३५ मीटर आहे तसेच त्याची सरासरी रुंदी ४ मीटर एवढी आहे. या व्यतिरिक्त मेट्रो स्टेशनमध्ये प्रवेश करण्यासाठी अधिकाधिक साधनांचा उपयोग केलेला आहे. विशेषत: एस्केलेटर, जिना तसेच येथे सीसीटीव्ही कॅमेरा, सुरक्षा कर्मचारी उपस्थिती इत्यादी घटकही प्रस्तावित आहेत.

३.३ प्राधिकरणाने मेट्रो मार्ग ७ चे गोरेगाव पूर्व मेट्रो हे स्थानक राममंदीर ह्या उपनगरीय रेल्वे स्थानकाला पादचारी पुलामार्फत जोडणेबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी, निविदा प्रक्रिया व्यवस्थापन तसेच प्रकल्प व्यवस्थापन इत्यादिसाठी सल्लागार म्हणून मे. ॲमिॲंड व पॅडेको (संयुक्त उपक्रम) या सल्लागाराची नियुक्ती केलेली होती. सदर सल्लागाराने तांत्रिक बाबी लक्षात घेऊन प्रकल्प अहवाल सादर केला आहे.

३.४ चर्चेस अनुसरुन असे नमूद केले की, मेट्रो मार्ग ७ चे गोरेगाव पूर्व मेट्रो स्थानक ते राममंदिर ह्या उपनगरीय रेल्वे स्थानकापर्यंतच्या पादचारी पुलाच्या अंमलबजावणीकरीता येणारा अंदाजित खर्च रु. ५७,९३,१९,२५३/- (वस्तू व सेवा कर विरहित) इतका आहे. सदर अंदाजित खर्च हा सार्वजनिक बांधकाम विभागांच्या निर्धारित दराच्या (SSR) २०२२-२३, व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या निर्धारित दराच्या (SOR) २०१८-२०१९ धर्तीवर तयार केलेला आहे. वरील अंमलबजावणीची किंमत जागेच्या तत्कालीन स्थितीप्रमाणे थोडीफार बदलू शकते.

३.५ पुढे असेही नमूद केले की, सदर पादचारी पुलाच्या अंमलबजावणीसाठी दिनांक २१/१०/२०२२ रोजी वृत्तपत्रांमध्ये निविदा सुचना प्रकाशित केली होती व प्राधिकरणाच्या ई-निविदा पोर्टलवर कंत्राटदारांच्या नियुक्तीसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक १८/११/२०२२ ही होती. दिनांक २१/११/२०२२ रोजी लिफाफा ‘अ’ उघडण्यात आला. त्यानुसार खालील ३ निविदाकारांकडून निविदा प्राप्त झाल्या :-

| अ.क्र. | निविदाकारांची नावे |
|---|---|
| १ | मे. नीरज सिमेंट स्ट्रक्चरल्स लिमिटेड व मे. फोर्स कन्स्ट्रक्शन प्रा. लि. (संयुक्त उपक्रम) |
| २ | मे. युनिवास्तु इंडिया लि.व मे. एस. एस. साठे ॲंड कंपनी (संयुक्त उपक्रम) |
| ३ | मे. सॅटेक एनव्हायर इजिनियरिंग प्रा. लि. व मे. एम. आर. हायटेक इजिनियर्स प्रा. लि. (संयुक्त उपक्रम) |

३.६ निविदा रक्कम, अनामत रक्कम व जियो टॅगिंग हे सर्व तपासल्यानंतर लिफाफा ‘ब’ (तांत्रिक प्रस्ताव) उघडण्यात आले. निविदा मुल्यमापन समितीने एकूण २ बैठकींमध्ये सर्वसाधारण मुल्यमापन तसेच तांत्रिक मुल्यमापन करुन सर्वंकष अभिप्राय सादर केला. निविदाकारांनी सादर केलेल्या तांत्रिक प्रस्तावांची छाननी व मुल्यमापन केल्यानंतर मुल्यमापन समितीने असा अभिप्राय दिला की, तिन्ही निविदाकार तांत्रिक मुल्यमापनामध्ये पात्र ठरले असून त्यांचा लिफाफा ‘क’ (आर्थिक प्रस्ताव) उघडण्यात यावा. त्यानुसार, दिनांक ३०/११/२०२२ रोजी

तिनही पात्र निविदाकारांचे आर्थिक प्रस्ताव उघडण्यात आले. आर्थिक प्रस्तावाबाबतची माहिती खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | निविदाकारांची नावे | **आर्थिक प्रस्ताव** अंदाजित खर्चापेक्षा **(कमी/जास्त)** | **आर्थिक प्रस्ताव किंमत (रु.)** (वस्तू व सेवा कर विरहित) |
|---|---|---|---|
| १ | मे. नीरज सिमेंट स्ट्रक्चरल्स लिमिटेड व मे. फोर्स कन्स्ट्रक्शन प्रा. लि. (संयुक्त उपक्रम) | [+] ६.३९ % | ६१,६३,३७,७५३.२७ |
| २ | मे. युनिवास्तु इंडिया लि.व मे. एस. एस. साठे अँड कंपनी (संयुक्त उपक्रम) | [+] ८.१८ % | ६२,६७,०७,५६७.९० |
| ३ | मे. सॅटेक एनव्हायर इजिनियरिंग प्रा. लि. व मे. एम. आर. हायटेक इजिनियर्स प्रा. लि. (संयुक्त उपक्रम) | [+] १६.५० % | ६७,४९,०६,९२९.७५ |

३.७ सर्वात कमी आर्थिक प्रस्ताव मे. नीरज सिमेंट स्ट्रक्चरल्स लिमिटेड व मे. फोर्स कन्स्ट्रक्शन प्रा. लि. (संयुक्त) या निविदाकाराचा रु. ६१,६३,३७,७५३.२७ इतका होता. त्यामुळे त्या निविदाकारास निविदा मुल्यमापन समितीकडून वाटाघाटीकरीता बोलाविण्यात आले. वाटाघाटीनंतर वरील निविदाकार सदर पादचारी पुलाच्या अंमजबजावणीचे काम अंदाजित रक्कम रु. ५७,९३,१९,२५३/- (वस्तू व सेवा कर विरहित) करण्यास तयार झाले. तसे मान्यतेचे पत्र त्यांनी प्राधिकरणास सादर केले.

३.८ चर्चेदरम्यान, असे नमूद केले की, निविदा मुल्यमापन समितीने दिनांक ०७/१२/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत सदर निविदाकारास [मे. नीरज सिमेंट स्ट्रक्चरल्स लिमिटेड व मे. फोर्स कन्स्ट्रक्शन प्रा. लि. (संयुकृत उपक्रम) मेट्रो मार्ग ७ चे गोरेगाव पूर्व मेट्रो स्थानक ते राममंदिर ह्या उपनगरीय रेल्वे स्थानकापर्यंतच्या पादचारी पुलाच्या अंमलबजावणीकरीता कंत्राटदार म्हणून नियुक्ती करण्यास हरकत नाही असा अभिप्राय दिलेला आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४४० :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे "मेट्रो मार्ग ७ चे गोरेगाव (पूर्व) मेट्रो स्थानक ते राममंदिर ह्या उपनगरीय रेल्वे स्थानकापर्यंतच्या पादचारी पुलाच्या अंमलबजावणीकरीता" मे. नीरज सिमेंट स्ट्रक्चरल्स लिमिटेड व मे. फोर्स कन्स्ट्रक्शन प्रा. लि. (संयुक्त) यांचा रु. ५७,९३,१९,२५३/- (वस्तू व सेवा कर विरहित) एवढ्या किंमतीचा वाटाघाटी करुन आलेला आर्थिक देकार स्विकारण्यास व त्यांची नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**बाब क्र. ४ : मेट्रो मार्ग-४ (वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली) अंतर्गत पॅकेज क्र.०८ मधील होणाऱ्या वाढीव खर्चास मंजूरी देणेबाबत.**

४.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगीतले की, मुंबई मेट्रो बृहत आराखड्यामधील ११८ कि.मी. मेट्रो मार्गांच्या जलद अंमलबजावणी करीता प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या १३८ व्या बैठकीत व मंत्रीमंडळाच्या दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५च्या बैठकीत मान्यता दिली आहे.सदर बृहत आराखड्यामधील मेट्रो मार्ग-४ वडाळा-घाटकोपर - मुलुंड - ठाणे - कासारवडवली प्रकल्पाकरीता रू.१४,५४९ कोटी किंमतीस राज्य शासनाने मान्यता दिली आहे. तसेच प्रकल्पासाठी अंमलबजावणी संस्था म्हणून प्राधिकरणास मान्यता दिली आहे.

४.२ चर्चेस अनुसरुन असे नमूद केले की, सदर प्रकल्प वेळेवर पुर्ण करण्याकरिता मुळ कंत्राटात अंतर्भूत नसलेली परंतू निकडीची असणारी प्रकल्पसंलग्न वाढीव/आवश्यक अतिरिक्त कामे करणे गरजेचे आहे. मेट्रो मार्ग -४ च्या तयार केलेल्या ट्रेन ऑपरेशन प्लॅन नुसार मेट्रो मार्ग – ११, मेट्रो मार्ग -४, ४अ व मेट्रो मार्ग-१० हे एकत्रित गृहित धरले आहेत.

त्यामुळे पहाटचे वेळेच्या काही मेट्रो गाडया मोघरपाडा डेपोपासून थेट छत्रपती शिवाजी महाराज ट्रर्मिनल पर्यंत रिकाम्या धावणे अपरिहार्य होते. हि अडचण सोडविण्यासाठी दक्षिणेकडे एका ठिकाणी साईडिंग लाईन म्हणजे पॉकेट ट्रॅक असणे आवश्यक झाले. सदर ठिकाण हे भक्तीपार्क मेट्रो स्थानकाच्या दक्षिणेकडील मेट्रो मार्गिकेत निश्चित करण्यात आले व त्याकरिता दोन अतिरिक्त ट्रॅक समाविष्ट करण्यात आले. सदर कामासाठी अतिरिक्त खर्च रु. ३८,८५,०८,५९६/- इतका आहे.

४.३ मेट्रो मार्ग -४ मधील भक्ति पार्क मेट्रो स्थानक हे तिथल्या मोनो रेल्वे स्थानकापासून १२ मी. अंतरावर दोन पोर्टल पियरवर नियोजित होते. मात्र एकीकडीचे पोर्टल पियर हे वन विभागाच्या कांदळवन भागात येत असल्याने कांदळवनाचे संरक्षण व्हावे याकरिता भक्तिपार्क मेट्रो स्थानक दोन पोर्टल पियरवर ऐवजी एक खांबाच्या कॅन्टीलिवर पियरवर नियोजित करण्यात आले. वाढीव बांधण्यासाठी रु. ३३,८५,१९,२७३/- अतिरिक्त खर्च अपेक्षित आहे.

४.४ वडाळा टीटी मेट्रो स्थानक हे मुळात जीएसटी विभागाच्या जागेमध्ये नियोजित होते. मात्र जीएसटीविभागाने सदर अतिभव्य जीएसटी भवन निर्माण करण्याचे प्रस्तावित केल्याने नियोजित वडाळा टीटी मेट्रो स्थानक रस्त्याकडे पर्यायाने मोनोरेल्वे जवळ सरकवावे लागत होते. सदर विषयाबाबतीत माननीय मुख्यमंत्री यांनी दिनांक २७ मे, २०१९ च्या वॉर रुम बैठकीत मेट्रो स्थानक रस्त्याकडे अधिक न सरकवता त्याचे जीएसटी भवनाशी एकत्रिकरण करावे असे आदेश दिले. या एकत्रिकरणामुळे वडाळा टीटी मेट्रो स्थानक दोन ऐवजी तीन मजलांचे होत आहे. तसेच जीएसटी भवन व मोनोरेल्वे यांच्या मधोमध बांधण्यास पुरेशी जागा नसल्यामुळे गर्डर आणून उचलून ठेवणे शक्य नाही. त्यामुळे सदर स्थानक कास्ट-इन-सीटू पध्दतीने करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.सदर कामासाठी अतिरिक्त खर्च रु. ४९,९५,९७,८४९/- इतका आहे.

४.५ चर्चेस अनुसरुन असे नमूद केले की, वरील बाबींस व पॅकेज ०८ अंतर्गत इतर अतिरिक्त संलग्न कामे करण्याकरिता सूमारे रु.१४२,१९,६७,६७७/- (कंत्राटीय रक्कमेच्या सुमारे २६.३३%) इतका खर्च होणे अंदाजित असून त्याचे विवरण पुढीलप्रमाणे आहे:-

.. ८/-

**List of variation approved for package CA-08 of Metro Line-4 is as below:**

| Sr. No. | Description | Proposed Amount (Rs.) | Percentage of Variation against actual value i.e. Rs 540. Cr. | Remarks |
|---|---|---|---|---|
| 1. | Pile and Pile Cap Work | 5,18,12,482/- | 0.953% | Approved. |
| 2. | Soil Resistivity Test | 3,40,560/- | 0.0063% | Approved. |
| 3. | Earthing Rod | 11,74,392/- | 0.021% | Approved. |
| 4. | Extra Cost due to additional reinforcement in U-Girder | 68,40,155/- | 0.127% | Approved. |
| | **Total Amount** | **6,01,67,589/-** | **1.114%** | |

**List of variation proposed for package CA-08 of Metro Line-4 is as below:**

| Sr. No | Description | Proposed Amount (Rs.) | Percentage of Variation against actual value i.e. Rs.540 Cr. | Remarks |
|---|---|---|---|---|
| 1. | Variation in quantification of Wadala TT station as per GFC drawing for contract package CA 08 | 49,95,97,849 | 9.252% | Proposed in this note |
| 2. | Variation in quantification of Siddharth Colony Station as per GFC drawing for contract package CA 08 | 3,91,04,043 | 0.724% | Proposed in this note |
| 3. | Submission of Variation in quantification of Bhakti Park Station in CA 08 as per GFC drawing | 33,85,19,273 | 6.269% | Proposed in this note |
| 4. | Variation in quantification due to introduction of pocket track Bhakti Park Station for CA08: | 38,85,08,596 | 7.195% | Proposed in this note |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5. | Submission of Variation in Quantification of Suman Nagar Station in CA 08 Package as Per GFC Drawings | -14,57,75,980 | -2.70% | Proposed in this note |
| 6. | Submission of Variation in Quantification of Amar Mahal Station in CA 08 Package as Per GFC Drawings | -25,02,57,433 | -4.634% | Proposed in this note |
| 7. | Implementation of RDSO 2017 in lieu of RDSO 2017 | 13,83,05,696 | 2.561% | Proposed in this note |
| 8. | Submission of Variation in cost due to decrease in floor area of Anik Nagar Station with respect to Tender & GFC drawing | -73,36,220 | -0.136% | Proposed in this note |
| 9. | Variation in quantity of Pile liners for Contract CA08 | 20,02,76,119 | 3.709% | Proposed in this note |
| 10. | Submission of Variation in quantification for changes in Pier height and Pier type from Normal Pier to Cantilever Pier due to utility infringement and alignment Change | 8,55,55,653 | 1.584% | Proposed in this note |
| 11. | Interim Additional Cost Claim for modifying the substructure due to infringement from unchartered underground Utility. | 7,53,02,492 | 1.394% | Proposed in this note |
| 12. | **Total (1+2+3+4+5+6+7+8+9+10+11) = A** | **136,18,00,088/-** | **25.216%** | **Proposed Variations** |
| 13. | Already approved variations = B | 6,01,67,589/- | 1.114/% | Already approved. |
| 14. | **Grand Total (C) = A+B** | **142,19,67,677/- (including GST)** | **26.33%** | |
| 15. | Contract cost (D) | 540,00,00,000/- | | |
| 16. | **Revised Contract cost = C + D** | **682,19,67,677/-** | | |

४.६ चर्चेदरम्यान, असे नमुद केले की, मेट्रो मार्ग -४, पॅकेज ०८ च्या कंत्राटात नमुद नसलेल्या व मूळकामानुसार अविभक्त अशी वाढीव कामे, अतिरिक्त कामे व कंत्राटातील बाबींच्या परिणामामधील वाढीपोटी कंत्राटाच्या मंजूर रक्कमेत होणारी रुपये १४२,१९,६७,६७७/-

(कंत्राटीय रक्कमेच्या सुमारे २६.३३ %) ची अतिरिक्त वाढ व त्या अनुषंगाने कंत्राटातील तरतुदींनुसार देय असलेल्या भाववाढीस व सुधारीत कंत्राट रक्कम रू. ६८२,१९,६७,६७७/- यास मंजूरी मिळण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४४१:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उप कलम (३) व (५) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कंत्राटात नमूद नसलेल्या वाढीव कामे, अतिरिक्त बाबी व कंत्राटातील बाबींच्या परिमांणामधील वाढीपोटी कंत्राटाच्या मंजूर रक्कमेत होणारी रू. १४२,१९,६७,६७७/- (कंत्राटीय रकमेच्या सुमारे २६.३३ %) ची अतिरिक्त वाढ व त्या अनुषंगाने कंत्राटातील तरतुदींनुसार देय असलेल्या भाववाढीस व सुधारीत कंत्राट रक्कम रू. ६८२,१९,६७,६७७/- ला मंजूर करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**बाब क्र. ५: मेट्रो मार्ग-४ (वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली) अंतर्गत पॅकेज क्र.१० मधील होणाऱ्या वाढीव खर्चास मंजूरी देणेबाबत.**

५.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई मेट्रो बृहत आराखड्यामधील ११८ कि.मी. मेट्रो मार्गांच्या जलद अंमलबजावणी करीता प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या १३८ व्या बैठकीतव मंत्रीमंडळाच्या दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५च्या बैठकीत मान्यता दिली आहे.सदर बृहत आराखड्यामधील मेट्रो मार्ग-४ वडाळा-घाटकोपर - मुलुंड - ठाणे - कासारवडवली प्रकल्पाकरीतारू.१४,५४९ कोटी किंमतीस राज्य शासनाने मान्यता दिली आहे.तसेच प्रकल्पासाठी अंमलबजावणी संस्था म्हणून प्राधिकरणास मान्यता दिली आहे.

५.२ सदर प्रकल्प वेळेवर पुर्ण करण्याकरिता मुळ कंत्राटात अंर्तभूत नसलेली, परंतू निकडीची असणारी प्रकल्प संलग्न वाढीव/आवश्यक अतिरिक्त कामे करणे गरजेचे आहे. मेट्रो मार्ग -४अ हा कासारवडवली ते गायमुख पर्यंतचा सुमारे २.६६८ कि.मी. लांबीच्या प्रस्तावास प्राधिकरणाने मान्यता दिली आहे. त्यामुळे मेट्रो मार्ग -४ व ४अ ची एकुण लांबी ३५.३८ कि.मी. इतकी होते. सदर विस्तार लक्षात घेता, मेट्रो गाडया अचानक बंद पडल्यास बाजूला घेऊन पाहणी करिता व/वा दुरुस्ती करिता दोन्ही मेट्रो मार्गिकेच्या मध्ये अतिरिक्त साईडिंग लाईन म्हणजे पॉकेट ट्रॅक असणे आवश्यक आहे व ही योजना मेट्रो मार्गिकेच्या संपूर्ण लांबीच्या साधारणत: मध्यावर असते. हे लक्षात घेऊन सोनापुर मेट्रो स्थानकानंतर या पॉकेट ट्रॅकचे ठिकाण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार वाढीव कामाकरिता कंत्राटदाराने वाढीव खर्चाचा प्रस्ताव सादर केला आहे. त्या प्रस्तावाची छाननी साधारण सल्लागाराने केली असून, त्यांनी रु.४६,५७,८४,८२६/- रुपयांच्या प्रस्तावाची प्राधिकरणाकडे शिफारस केली आहे.

५.३ चर्चेस अनुसरुन असे नमूद केले की, मेट्रो मार्ग -४ ची लांबी ३२.३२ कि.मी. असून त्यात ३० स्थानकांचा समावेश होता या ३० स्थानकांपैकी १५ स्थानके पोर्टल तर १५ स्थानके कॅन्टीलिवर होती. परंतू कंत्राटदारांने पोर्टल स्थानकांच्या कामांमध्ये येणाऱ्या अडथळयाबाबत जसे की, भुसंपादन, अरुंद रस्ता, विविध सेवावाहिन्या स्थलांतराचा प्रश्न इत्यादी बाबी प्राधिकरणास सुचीत केले. त्यानुसार गांधी नगर मेट्रो स्थानक, नेव्हल हाऊसिंग, भांडुप महापालिका, सोनापुर ही स्थानके पोर्टल न करता कॅन्टीलिवर स्थानकामध्ये रुपांतरित करण्याचे प्रस्तावित केले. मेट्रो मार्ग -४ व मेट्रो मार्ग -६ हे दोन्ही लाल बहादूर शास्त्रीमार्गावर गांधीनगर जंक्शन येथे एकत्र येतात. मूळ कंत्राटात मेट्रो मार्ग -४ चे गांधीनगर स्थानक व मेट्रो मार्ग - ६ कांजूरमार्ग स्थानक यांचे एकत्रीकरण समाविष्ट आहे. मात्र मेट्रो मार्ग -६ च्या डि.एम.आर.सी. संस्थेने कळविल्यानुसार त्यांच्या कांजूरमार्ग स्थानकातील सिस्टिमच्या सर्व खोल्या व यंत्रणा मेट्रो मार्ग -४ च्या गांधीनगर स्थानकात प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे गांधीनगर स्थानकाचे चटई क्षेत्र वाढते. त्यानुसार व इतर अनुषांगिक घटकांचा विचार करुन कंत्राटदाराने कंत्राटातील मेट्रो स्थानकांच्या चटई क्षेत्राच्या किमंतीतील वाढीचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाची छाननी साधारण सल्लागाराने केली असून, त्यांनी रु.४३,३०,६०,०६६/- रुपयांच्या प्रस्तावाची प्राधिकरणाकडे शिफारस केली आहे.

५.४  चर्चेस अनुसरुन असे नमूद केले की, कंत्राटानुसार शेडयुल 'सी' मध्ये सेवावाहिन्यांचे स्थलांतरण, वृक्ष तोडणी व पुर्नरोपण तसेच इतर अनुषांगिक आकस्मिक खर्च इत्यादीं करिता रु.४२,१८,७२,६६८/-इतक्या रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी रु. ३१,४१,१०,८५८.४५/- इतक्या रक्कमेस सेवावाहिन्यांच्या स्थलांतरणाकरिता मान्यता देण्यात आली आहे. परंतू मेट्रो स्थानकांच्या प्रवेश /निकास दरम्यान आढळणाऱ्या सेवावाहिन्यां आणि उर्वरित मार्गिकेच्या ठिकाणी जेथे सेवावहिन्याची स्थळ चाचणी झालेली नाही अशा ठिकाणचे स्थलांतरण व इतर आवश्यक कामांकरिता सल्लागाराने रु. २६,५८,३८,६०९.४५/- इतक्या अतिरिक्त रक्कमेची आवश्यकता असल्याचे प्राधिकरणास कळविले आहे. उर्वरित स्थापत्य कामांचा विचार केला असता सदर प्रस्तावित अतिरिक्त रक्कमेची शेडयुल 'सी' मध्ये आवश्यकता आहे.

५.५  वरील बाबींस व पॅकेज १० अंतर्गत इतर अतिरिक्त संलग्न कामे करण्याकरिता सूमारे रु.१५२,६८,६६,५३६/- कोटी (कंत्राटीय रक्कमेच्या सुमारे २९.७६३%) इतका खर्च होणे अंदाजित असून, त्याचे विवरण खालीलप्रमाणे आहे:-

**List of variation approved for package CA-10 of Metro Line-4 is as below:**

| Sr. No | Description | Proposed Amount (Rs.) | Percentage of Variation against actual value i.e.Rs.513 Cr | Remarks |
|---|---|---|---|---|
| 1. | Pile and Pile Cap Work | 8,40,66,546/- | 1.638 % | Approved. |
| 2. | Soil Resistivity Test | 7,30,656/- | 0.014% | Approved. |
| 3. | Utility Identification | 8,36,332/- | 0.016% | Approved. |
| 4. | Earthing Rod | 12,01,233/- | 0.023% | Approved |
| 5. | Additional Road Restoration | 10,59,057/- | 0.021% | Approved |
| 6. | Increase in Quantity of Reinforcement in U-Girder | 74,30,305/- | 0.145% | Approved |
| | **Total** | **9,53,24,129/-** | **1.857%** | |

**List of variation proposed for package CA-10 of Metro Line-4 is as below:**

| Sr. No | Description | Proposed Amount (Rs.) | Percentage of Variation against actual value i.e. Rs. 513 Cr | Remarks |
|---|---|---|---|---|
| 1. | Additional cost on account of change in station area with respect to tender & GFC drawings due to conversing of station form Portal type to Cantilever in Package CA-10 of Metro Line-4. | 43,30,60,066/- | 8.442% | Proposed in this note |
| 2. | Additional cost in quantification due to introduction of pocket track. | 46,57,84,826/- | 9.080% | Proposed in this note |
| 3. | Variation due to Implementation of RDSO 2017 in lieu of RDSO 2015. | 13,69,51,483/- | 2.669% | Proposed in this note |
| 4. | Additional cost in quantification due to introduction of Special Span at Sonapur Junction. | 7,70,32,200/- | 1.502% | Proposed in this note |
| 5. | Additional cost in quantification due to RCC Box drains at P154 to P163A from Normal to Portal Viaduct of Substructure at Sonapur. | 4,35,98,190/- | 0.850% | Proposed in this note |
| 6. | Additional cost on account of change in Normal Pier to Cantilever Pier | 92,77,032/- | 0.180% | Proposed in this note |
| 7. | Schedule -C | 26,58,38,609.45 | 5.182% | Proposed in this note |
| 8. | Total (Sr. no.(1+2+3+4+5+6+7)) = A | 143,15,42,407- | 27.905% | Proposed Variations |
| 9. | Already approved variations = B | 9,53,24,129/- | 1.857% | Already approved. |
| 10. | **Grand Total (C) = A+B** | **152,68,66,536/- (including GST)** | **29.763%** | |
| 11. | Contract cost (D) | 513,00,00,000/- | | |
| 12. | **Revised Contract cost = C + D** | **665,68,66,536/-** | | |

५.६ चर्चेदरम्यान, मेट्रो मार्ग -४, पॅकेज १० च्या कंत्राटात नमुद नसलेल्या व मूळ कामानुसार अविभक्त अशी वाढीव कामे, अतिरिक्त कामे व कंत्राटातील बाबींच्या परिणामामधील वाढीपोटी कंत्राटाच्या मंजूर रक्कमेत होणारी रू.१५२,६८,६६,५३६/- (कंत्राटीय रकमेच्या सुमारे २९.७६३ %) ची अतिरिक्त वाढ व त्या अनुषंगाने कंत्राटातील तरतुदींनुसार देय असलेल्या भाववाढीस व सुधारीत कंत्राट रक्कम रू. ६६५,६८,६६,५३६/- ला मंजूरी मिळण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४४२:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उप कलम (३) व (५) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कंत्राटात नमूद नसलेल्या वाढीव कामे, अतिरिक्त बाबी व कंत्राटातील बाबींच्या परिमांणामधील वाढीपोटी कंत्राटाच्या मंजूर रक्कमेत होणारी रू. १५२,६८,६६,५३६/- (कंत्राटीय रकमेच्या सुमारे २९.७६३ %) ची अतिरिक्त वाढ व त्या अनुषंगाने कंत्राटातील तरतुदींनुसार देय असलेल्या भाववाढीस व सुधारीत कंत्राट रक्कम रू. ६६५,६८,६६,५३६/- ला मंजूर करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**बाब क्र. ६: मेट्रो मार्ग-४ (वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली) अंतर्गत पॅकेज क्र.१२ मधील होणाऱ्या वाढीव खर्चास मंजूरी देणेबाबत.**

६.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई मेट्रो बृहत आराखड्यामधील ११८ कि.मी. मेट्रो मार्गांच्या जलद अंमलबजावणी करीता प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या १३८व्या बैठकीत व मंत्रीमंडळाच्या

.. १५/-

दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५ च्या बैठकीत मान्यता दिली आहे. सदर बृहत आराखड्यामधील मेट्रो मार्ग-४ वडाळा - घाटकोपर - मुलुंड - ठाणे - कासारवडवली प्रकल्पाकरीता रू.१४,५४९ कोटी किंमतीस राज्य शासनाने मान्यता दिली आहे. तसेच प्रकल्पासाठी अंमलबजावणी संस्था म्हणून प्राधिकरणास मान्यता दिली आहे.

६.२ चर्चेस अनुसरुन असे नमूद केले की, सदर प्रकल्प वेळेवर पुर्ण करण्याकरिता मुळ कंत्राटात अंर्तभूत नसलेली पंरतू निकडीची असणारी प्रकल्प संलग्न वाढीव/आवश्यक अतिरिक्त कामे करणे गरजेचे आहे. मेट्रो मार्ग -४ च्या कापूरबावडी स्थानकापासून ५०० मीटर अंतरावर मेट्रो मार्ग- ५ चे स्थानक प्रस्तावित होते. दोन मेट्रो मार्गांमधील प्रवाशांचा प्रवास सुलभ करण्यासाठी, मेट्रो लाईन - ५ मधील कापूरबावडी स्थानक वगळून ते मेट्रो मार्ग - ४ च्या कापूरबावडी स्थानकाशी जोडण्याचा प्रस्ताव आहे जेणेकरुन भिंवडी व परिसरातील प्रवाशांस मुंबई शहरास मेट्रो मार्ग — ४ द्वारे जोडणे शक्य होईल. सदर कामाकरीता कापूरबावडी स्थानकाच्या मुळ आराखडयामध्ये बदल करणे अपरिहार्य होते. सदर कामासाठी अतिरिक्त खर्च रु. ५१,०३,९०,४०९/- इतका आहे.

६.३ मेट्रो मार्ग- ४ व ५ स्थानकांच्या एकत्रीकरणासाठी साधारणत: ७२० मी. लांबीच्या मार्गिकेत अतिरिक्त बदल करणे आवश्यक आहे. वाढीव मार्गिका बांधण्यासाठी रु. ४७,९६,९१,३९५/- अतिरिक्त खर्च अपेक्षित आहे.

६.४ घोडबंदर रस्ता हा गुजरात, जे.न.पी.टी., पुणे, गोवा इत्यादी महत्वाच्या ठिकाणांना जोडणारा महत्वाचा रस्ता आहे. रात्रंदिवस या रस्त्यावर अवजड वाहतुकीची मोठ्या प्रमाणात वर्दळ चालू असते. यात स्थानिक वाहतुकीची भर पडली असल्यामुळे अपघाताच्या संख्येंत वाढ झाली आहे. घोडबंदर रस्त्यावर असणाऱ्या ७ महत्वाच्या जंक्शन पैकी कापूरबावडी, मानपाडा, पाटलीपाडा आणि वाघबीळ या ४ जंक्शनवर यापूर्वीच उड्डाणपूल बांधण्यात आले आहेत. जनतेची व स्थानिक लोकप्रतिनिधिंची सदर तिन्ही उड्डाणपुलांबाबत आग्रही मागणी आहे. आनंदनगर, कासारवडवली व भाईंदरपाडा या उर्वरित ३ जंक्शनवर वाहतुक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने उड्डाणपूल बांधणे अत्यंत आवश्यक आहे. मेट्रो प्रकल्प व उड्डाणपूल या दोन्ही प्रकल्पांच्या अमंलबजावणी करीता योग्य तो समन्वय साधण्याच्या दृष्टीकोनातून त्याचप्रमाणे अत्यंत वर्दळीचा असलेल्या घोडबंदर मार्गावर कमीत कमी वाहतूक कोंडी होण्याच्या दृष्टीकोनातून मेट्रो मार्ग-४ प्रकल्पाच्या कामांतर्गत आनंदनगर उड्डाणपूलांचे काम करण्याचे प्रस्तावित आहे. सदर कामासाठी अतिरिक्त खर्च रु. ४४,८९,६६,९८१/- इतका आहे.

६.५ वरील बाबींस व पॅकेज १२ अंतर्गत इतर अतिरिक्त संलग्न कामे करण्याकरिता सूमारे रु.२११,००,९१,३५३/- (कंत्राटीय रक्कमेच्या सुमारे ४०%) इतका खर्च होणे अंदाजीत असून त्याचे विवरण खालीलप्रमाणे आहे :-

**मंजूर अतिरिक्त बाबींची यादी**

| अनु.क्र. | तपशिल | मंजूर रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १) | पायाचे कामाच्या प्रमाणातील तफावत रक्कम | १,२४,८१,८६८/- |
| २) | मातीची प्रतिरोधकता चाचणी | ५,५८,६००/- |
| ३) | आर्थिंग रॉड | १२,७२,६४६/- |
| ४) | सेवा वाहिण्या ओळख (Utility Identification) | १६,९३,७५०/- |
| ५) | उच्चदाब विद्युत वाहिनीचे स्थलांतर (पि९० ते पि११९) | ६,७४,६२,७१५/- |
| ६) | उच्चदाब विद्युत वाहिनीचे स्थलांतरचे सुधारीत अंदाजपत्रक (कासारवडवली स्थानक) | ५०,१५,६५३/- |
| | **एकूण रक्कम** | **८,८४,८५,२३२/-** |
| | टक्केवारीतील कराराच किंमतीशी संबंधित एकूण मंजूर तफावत रक्कम | १.६६६% |

**अंतर्गत बदल किंवा अपेक्षित अतिरिक्त तफावत**

| अ.क्र. | तपशिल | मंजूर रक्कम (रूपये) | तफावत रक्कम (%) | अपेक्षित अतिरिक्त तफावत |
|---|---|---|---|---|
| १) | कापूरबावडी स्थानकातील बदल | ५१,०३,९०,४०९/- | ९.६१२ | प्रस्तावित |
| २) | एकत्रीकरणाकरीता साधारणत: ७२० मी. लांबीच्या मार्गिकेत अतिरिक्त बदल | ४७,९६,९१,३९५/ | ९.०३४ | प्रस्तावित |
| ३) | आनंदनगर उड्डाणपूल | ४४,८९,६६,९८१/- | ८.४५५ | प्रस्तावित |
| ४) | डेपोसाठीचे पोचमार्ग (Vaiduct and Ramp) वगळणे | (-) १८,३२,६७,३००/- | -३.४५१ | प्रस्तावित |
| ५) | कंत्राटात भुकंप रोधक बांधकामासाठी | १६,९६,३१,९६२/- | ३.१९५ | प्रस्तावित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६) | यु-गर्डरमधील सळयांच्या प्रमाणामध्ये वाढ | ८१,६६,१०४/- | ०.१५४ | प्रस्तावित |
| ७) | डोगंरीपाडा स्थानकाचे अतिरिक्त काम | २२,१८,५४,८२१/- | ४.१७८ | प्रस्तावित |
| ८) | मेट्रो स्थानकाच्या चटई क्षेत्रात वाढ झाल्यामुळे होणारी तफावत | ७,७२,६२,५३३/- | १.४५५ | प्रस्तावित |
| ९) | स्पेशल स्पॅन:- | १०,७९,३४,९०५/- | २.०३३ | प्रस्तावित |
| १०) | अतिरिक्त पाईल चे काम | २९,१३,२३७/- | ०.०५५ | प्रस्तावित |
| ११) | मेट्रो खांब (Pier) व त्यावरील टोपी (Pier Cap) मध्ये झालेले बदल | ७,७९,७४,२९६/- | १.४६८ | प्रस्तावित |
| १२) | कंत्राटातील भाग 'क' (Schedule 'C') : | १०,००,८६,७७८/- | १.८८५ | प्रस्तावित |
| अ) | अपेक्षित अतिरिक्त कामांची किंमत | २०२,१६,०६,१२१/- | ३८.०७२ | |
| ब) | अतिरिक्त कामांची मंजूर किंमत | ८,८४,८५,२३२/- | १.६६६ | मंजूरी प्राप्त |
| क) | एकूण (अ +ब) | २११,००,९१,३५३/- | ३९.७३८ (i.e. ४०%) | |
| ड) | कराराची मूळ किंमत | ५३१,००,००,०००/- | | |
| इ) | पॅकज १२ ची अपेक्षित सुधारीत किंमत (भाव वाढ वगळता) = (ड +क) | ७४२,००,९१,३५३/- | | |

६.६ चर्चेस अनुसरुन पुढे असे नमुद केले की, मेट्रो मार्ग -४, पॅकेज १२ च्या कंत्राटात नमुद नसलेल्या व मूळ कामानुसार अविभक्त अशी वाढीव कामे, अतिरिक्त कामे व कंत्राटातील बाबींच्या परिणामामधील वाढीपोटी कंत्राटाच्या मंजूर रक्कमेत होणारी रुपये २११,००,९१,३५३/- (कंत्राटीय रकमेच्या सुमारे ४० %) ची अतिरिक्त वाढ व त्या अनुषंगाने कंत्राटातील तरतुदींनुसार देय असलेल्या भाववाढीस व सुधारीत कंत्राट रक्कम रू. ७४२,००,९१,३५३/- यास मंजूरी मिळण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला.**

**ठराव क्र. १४४३:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उप कलम (३) व (५) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कंत्राटात नमूद नसलेल्या वाढीव कामे, अतिरिक्त बाबी व कंत्राटातील बाबींच्या परिमांणामधील वाढीपोटी कंत्राटाच्या मंजूर रक्कमेत होणारी रू. २११,००,९१,३५३/- (कंत्राटीय रकमेच्या सुमारे ४० %) ची अतिरिक्त वाढ व त्या अनुषंगाने कंत्राटातील तरतुदींनुसार देय असलेल्या भाववाढीस व सुधारीत कंत्राट रक्कम रू. ७४२,००,९१,३५३/- ला मंजूर करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**बाब क्र. ७: मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "संचालक" (प्रणाली) या पदावरील नेमणूकीस मान्यता देणेबाबत.**

७.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी सागिंतले की, मुंबई महानगर प्रदेशात एकूण ११८ कि.मी. उन्नत मेट्रो मार्ग अग्रक्रमाने राबविण्यासाठी आवश्यकता असलेल्या तांत्रिक व अतांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता विचारात घेता, प्राधिकरणाच्या दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या १४१ व्या बैठकीत ठराव क्रमांक १३८२ अन्वये सदर प्रकल्पाकरीता प्राधिकरणाच्या आस्थापनेवर तांत्रिक संवर्गात नव्याने पदे निर्माण करण्यात आली आहेत.

७.२ चर्चेस अनुसरुन असे नमूद केले की, "संचालक (प्रणाली)" वेतनस्तर एस - ३० : रु. १४४२००-२१८२०० हे वरीष्ठ वेतनश्रेणीतील विभाग प्रमुख दर्जाचे पद असल्याने प्राधिकरणाचे नियुक्ती प्राधिकारी या नात्याने सदर पदावर नेमणूकीकरीता कार्यकारी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून खालीलप्रमाणे निवड समिती गठित करण्यात आली :-

| अ.क्र. | विभागीय पदोन्नती/निवड समिती | पदनाम |
|---|---|---|
| १. | महानगर आयुक्त | अध्यक्ष |
| २. | अतिरिक्त महानगर आयुक्त | सदस्य |
| ३. | श्री. शुभोदोय मुखर्जी, मु.का.अ.,मुं.मे.व.प्रा.लि. | तज्ञ सदस्य (बाह्य) |
| ४. | श्री. अजयकुमार भट्ट, संचालक (प्रणाली), मुं.मे.रे.कॉ. | तज्ञ सदस्य (बाह्य) |
| ५. | वित्तीय सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | सदस्य |
| ६. | श्री. पी.एम. यादव, प्रमुख, नगर रचना | मागासवर्गीयांचे प्रतिनिधी |
| ७. | सह महानगर आयुक्त | सदस्य सचिव |

..१९/-

७.३ उपरोक्त निवड समितीने "संचालक (प्रणाली)" वेतनस्तर एस - ३० : रु. १४४२००-२१८२०० या पदाकरीता ६ उमेदवारांच्या मुलाखती दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी घेतल्या. त्यानुसार शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव, पात्रता व योग्यता या सर्व बाबींचा विचार करुन एकमताने "संचालक (प्रणाली)" वेतनस्तर एस-३० : रु. १४४२००-२१८२०० या पदावर श्री. दिलीप कुमार सिन्हा, संचालक (प्रणाली), कोची मेट्रो रेल लिमिटेड, केरळ यांची सरळसेवेने नेमणूक करण्याची शिफारस केली. "संचालक (प्रणाली)" वेतनस्तर एस - ३० : रु. १४४२००-२१८२०० हे पद विभाग प्रमुख व त्यावरील दर्जाचे असल्याने सदर पदावर नेमणूक करण्याचे अधिकार कार्यकारी समितीला आहेत.

७.४ उपरोक्त निवड समितीने श्री. दिलीप कुमार सिन्हा, संचालक (प्रणाली) या पदावर सरळसेवेने नेमणूक करण्यास शिफारस केली. त्यानुसार श्री. दिलीप कुमार सिन्हा यांची "संचालक (प्रणाली)" या पदावर कार्यकारी समितीच्या मान्यतेच्या अधीन राहून नेमणूक करण्यात आली आहे. तरी कार्यकारी समितीस विनंती की, उपरोक्त नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी द्यावी.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४४४ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३) (एक) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे "संचालक (प्रणाली)" वेतनस्तर एस - ३० : रु. १४४२००-२१८२०० या पदावर श्री. दिलीप कुमार सिन्हा, संचालक (प्रणाली), कोची मेट्रो रेल लिमिटेड, केरळ यांची सरळसेवेने नेमणूक करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. "संचालक (प्रणाली)" या पदावर नेमणूक करणेकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीस तसेच सेवाप्रवेश नियमातील बदलास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्याकरीता महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ८: मुंबई मोनोरेल प्रकल्प, महालक्ष्मी मेट्रो आणि उपनगरीय रेल्वे मार्गाशी जोडण्यासाठी पादचारी पुलाच्या बांधकामाची अंमलबजावणीकरीता कंत्राटदाराची नियुक्ती करण्याबाबत मान्यता मिळणेबाबत.**

८.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अति गर्दीच्या व चिंचोळया भागात पूरक वाहतूक व्यवस्था म्हणून उन्नत मार्गावरुन धावणारा मोनोरेल प्रकल्प राबविण्यात आला .मोनोरेल प्रकल्पाची लांबी सुमारे २० कि.मी. असून १७ उन्नत स्थानके आहेत. मोनोरेल ताशी सरासरी वेग ३० कि.मी. व जास्तीत जास्त ८० कि.मी. प्रती तास गाठू शकते. शिवाय तीव्र वळणे व चढ-उतार सहज पार करु शकते, म्हणून गर्दीच्या व चिंचोळ्या भागात सदर प्रकल्प दोन टप्प्यामध्ये राबविण्यात आला. मुंबई मोनोरेल प्रकल्पाचा टप्पा-१ वडाळा ते चेंबूर माहे फेब्रुवारी, २०१४ रोजी प्रवासी वाहतुकीकरिता खुला करण्यात आला. तसेच, टप्पा-२ वडाळा ते संत गाडगे महाराज चौक माहे मार्च, २०१९ पासून प्रवासी वाहतुकीकरिता खुला करण्यात आला आहे.

८.२ याबाबत अशी चर्चा करण्यात आली की, मोनोरेल प्रकल्पाची चेंबूर आणि संत गाडगे महाराज चौक ही गंतव्य स्थानके महत्वाच्या सार्वजनिक वाहतूक ठिकाणी जोडली नाहीत, हे प्रवासी संख्या कमी असण्याचे मुख्य कारण आहे असे दिसते. प्राधिकरणाच्या सर्वंकष परिवहन अभ्यास-२ (Comprehensive Transportation Study-२) प्रमाणे अभ्यास केला असता, चेंबूर मोनोरेल स्थानक हे घाटकोपर मेट्रो आणि उपनगरीय रेल्वे स्थानकास आणि संत गाडगे महाराज चौक हे स्थानक महालक्ष्मी मेट्रो स्थानकाला जोडण्यात आल्यानंतर प्रवासी संख्या वाढण्यास मदत होईल .

८.३ त्याअनुषंगाने, मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्या दि. २० ऑक्टोबर २०२२ रोजी झालेल्या १५३ व्या बैठकीत, मोनोरेल प्रकल्पाची प्रवासी संख्या वाढविण्यासाठी, संत गाडगे महाराज चौक मोनोरेल स्थानक ते महालक्ष्मी मेट्रो आणि उपनगरीय रेल्वे स्थानकाला जोडणाऱ्या ३३५ मीटर लांबीच्या पादचारी पुलाच्या अंमलबजावणीसाठी अंदाजित किंमत रु.६३,६८,३३,०४८/- (वस्तू व सेवा विरहित) खर्च करण्यासाठी मान्यता देण्यात आली.

८.४ चर्चेस अनुसरुन असे नमूद केले की,, प्राधिकरणाच्या मान्यतेनुसार, संत गाडगे महाराज चौक मोनोरेल स्थानक ते महालक्ष्मी मेट्रो आणि उपनगरीय रेल्वे स्थानकाला पादचारी पुलाच्या अंमलबजावणीकरीता ई-निविदा दिनांक ३ नोव्हेंबर, २०२२ रोजी मागविण्यात आल्या. तसेच,

.. २१/-

निविदेच्या वेळापत्रकाप्रमाणे लिफाफा 'अ' आणि 'ब' दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजी उघडण्यात आल्या. सदर निवदा प्रक्रियेमध्ये ३ निविदाकाराने ई-निविदा सादर केल्या. प्राप्त ई-निविदांच्या पात्रतेची तांत्रिक छानणी केली असता तीनही निविदाकार पात्र असून त्यांचा तपशील खालीलप्रमाणे;

| अनु. क्र. | निविदाकाराचे नाव | तांत्रिकदृष्ट्या पात्रता |
|---|---|---|
| १ | मे. रक्षित इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट प्रा.लि., व मे. श्रीमंगल बिल्डकॉन प्रा.लि., (संयुक्त उपक्रम) | पात्र |
| २ | मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल्स लिमिटेड व मे. एस ॲण्ड के डेव्हलपर्स (संयुक्त उपक्रम) | पात्र |
| ३ | मे. सॅटेक एनव्हायर इंजिनियरिंग प्रा. लि. व मे. एम. आर. हायटेक इजिनियर्स प्रा. लि. (संयुक्त उपक्रम) | पात्र |

प्राप्त निविदेच्या छाननीसाठी प्राधिकरणाने निविदा शिफारस समिती गठीत करून, दिनांक ७ डिसेंबर, २०२२ रोजी झालेल्या निविदा शिफारस समितीच्या बैठकीत उपरोक्त तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदाकारांचा लिफाफा 'क' (वित्तीय प्रस्ताव) उघडण्यासाठी शिफारस करण्यात आली. त्यानुषंगाने, तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदाकारांचा लिफाफा 'क' दिनांक ७ डिसेंबर २०२२ रोजी उघडण्यात आल्या. निविदाकारांनी लिफाफा 'क' मध्ये सादर केलेल्या वित्तीय प्रस्तावाचा तपशील खालीलप्रमाणे

| अनु. क्र. | निविदाकाराचे नाव | निविदेची रक्कम रु. (वस्तु व सेवा कर विरहित) | प्राप्त रक्कम रु. (वस्तु व सेवा कर विरहित) | निविदेच्या रक्कमे पेक्षा (कमी/जास्त) |
|---|---|---|---|---|
| १ | मे. रक्षित इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट प्रायव्हेट लि. व मे. श्रीमंगल बिल्डकॉन प्रा.लि., (संयुक्त उपक्रम) | ६३,६८,३३,०४८ | ९४,४४,२३,४१०.१८४ | (+) ४८.३० |
| २ | मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल्स लिमिटेड व मे. एस ॲण्ड के डेव्हलपर्स (संयुक्त उपक्रम) | | ८९,४३,६८,३३२.६११ | (+) ४०.४४ |
| ३ | मे. सॅटेक एनव्हायर इंजिनियरिंग प्रा. लि. व मे. एम. आर. हायटेक इंजिनियर्स प्रा.लि. (संयुक्त उपक्रम) | | १०१,८२,९६,०४३.७५२ | (+) ५९.९० |

८.५ मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल्स लिमिटेड व मे. एस अ‍ॅण्ड के डेव्हलपर्स (संयुक्त उपक्रम) या निविदाकाराचा वित्तीय प्रस्ताव रु ८९,४३,६८,३३२.६११/- असून तो सर्वात कमी होता. प्राधिकरणाच्या निविदा शिफारस समितीच्या दिनांक २२ डिसेंबर २०२२ रोजी झालेल्या बैठकीत उपरोक्त निविदाकारास वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. त्यानुसार, मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल्स लिमिटेड व मे. एस अ‍ॅण्ड के डेव्हलपर्स (संयुक्त उपक्रम) यांनी निविदा शिफारस समितीच्या बैठकीत वाटाघाटी करून उपरोक्त विषयांच्या अंमलबजावणीचे काम रु. ७०,०५,१६,३५२.८०/- (वस्तु व सेवा कर विरहित) (निविदा रक्कमेच्या १०% अधिक) या प्रस्तावाप्रमाणे करण्याचे मान्य केले असून तशा आशयाचे पत्र सादर केले आहे.

८.६ त्याअनुषंगाने, निविदा शिफारस समितीने विचारविनिमय करून मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल्स लिमिटेड व मे. एस अ‍ॅण्ड के डेव्हलपर्स (संयुक्त उपक्रम) यांच्या वाटाघाटीनंतर सादर केलेल्या रु. ७०,०५,१६,३५२.८०/- (वस्तु व सेवा कर विरहित) (निविदा रक्कमेच्या १०% अधिक) या स्विकाहार्य प्रस्तावाची शिफारस केली.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४४५:**

“**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे, संत गाडगे महाराज चौक, मोनोरेल स्थानक ते महालक्ष्मी मेट्रो आणि उपनगरीय रेल्वे स्थानकाला जोडणाऱ्या पादचारी पुलाच्या अंमलबजावणीसाठी मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल्स लिमिटेड व मे. एस अ‍ॅण्ड के डेव्हलपर्स (संयुक्त उपक्रम) यांच्या वाटाघाटीनंतर सादर केलेल्या रु.७०,०५,१६,३५२.८०/- (वस्तु व सेवा कर विरहित) (निविदा रक्कमेच्या १०% अधिक) प्रस्ताव स्विकारण्यास व त्याअनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटी व शर्तीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे .

.. २३/-

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ९: विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ऐरोली-कटाई नाका प्रकल्पातील उजव्या बाजूकडील साखळी क्र. ५०३५ मी. ते साखळी क्र.५५३० मी. या लांबीमध्ये डोंगर कड्याचे संरक्षण करणे (द्वितीय मागणी) या कामाचे बांधकाम (Lumpsum) ठोक रक्कम पध्दतीवर करणेच्या लघुत्तम निविदा स्विकारण्यास मान्यता मिळणेबाबत.**

९.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाअंतर्गत रस्त्यांची बांधकामे व रुंदीकरण तसेच पुलांची कामे हाती घेण्याचे ठरले. यामध्ये ऐरोली ते कटाई नाका या एकूण १२.३ कि.मी. लांबीच्या प्रकल्पाचा अंतर्भाव होता. प्राधिकरणाच्या दिनांक २७/०६/२०१४ रोजी झालेल्या १३४ व्या बैठकीत सदर प्रकल्पासाठी एकूण रु. ९४४.२० कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर प्रकल्पाच्या एकूण १२.३ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे विकसन योग्य प्रकारे होण्याच्या दृष्टीने प्रकल्प ३ भागात विभागण्यात आला असून त्यातील भाग क्र. १, ठाणे बेलापूर रस्ता ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ असा एकूण ३.५० कि.मी. लांबीचा असून, भाग-२ मुलूंड ऐरोली पूल ते ठाणे बेलापूर रस्ता असा एकूण २.५७ कि.मी. लांबीचा आहे. सद्य:स्थितीत भाग-१ अंतर्गत उन्नत मार्गाचे ८८% आणि बोगदा व रस्त्याचे काम ६६% तसेच भाग-२ चे काम ६३% पूर्ण झाले असून, उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. तसेच सदर ऐरोली कटाई नाका भाग-१ व २ या प्रकल्पाच्या कामासाठी वाढीव रु. १४४१.३९ कोटी इतक्या खर्चाच्या रक्कमेस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २०/१०/२०२२ रोजी झालेल्या १५३ व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर मान्यतेमध्ये बोगदा व रस्त्याच्या कामाअंतर्गत "ऐरोली-कटाई नाका प्रकल्पातील उजव्या बाजूकडील साखळी क्र. ५०३५ मी. ते साखळी क्र. ५५३० मी. या लांबीमध्ये डोंगरकड्याचे संरक्षण करणे" या कामाचा अंतर्भाव आहे.

९.२ मुंबई, ठाणे व नवी मुंबई शहरातील वाहतुक कोंडी कमी करण्याबरोबरच विकास करण्याच्या दृष्टीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात येणा-या प्रस्तावित प्रकल्पांचा सुसाध्यता अहवाल (Feasibility Report) व सविस्तर प्रकल्प अहवाल (Detail Project Report) करणेकामी सल्लागारांची नेमणूक करुन घेणेस मान्यता देणेबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २०/१०/२०२२ रोजी झालेल्या १५३व्या बैठकीत रु. १७,२१४.७२ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर मान्यतेमध्ये ऐरोली कटाई नाका रस्ता प्रकल्पातंर्गत भाग-३ हा राष्ट्रीय महामार्ग क्र.४ ते कटाई नाका असा एकूण ६.२९ कि.मी. लांबीचा रस्ता आहे. सदर कामासाठी रु. १७७०.०० कोटी इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीचा अंतर्भाव आहे.

९. ३ चर्चेस अनुसरुन असे नमूद केले की, माहे जुलै, २०२१ मध्ये मुंब्रा येथील प्रकल्पाच्या आखणी मार्गाच्या उजव्या बाजूकडील साखळी क्र. ५०३५ मी. ते साखळी क्र. ५५३० मी. या लांबीमध्ये डोंगरकडा ढासळला. सदर डोंगरकडयाचे संरक्षण करणेच्या उपाय योजनांकरीता भारतीय प्रौद्योगिक संस्था, मुंबई (IIT, Bombay) यांचा सल्ला घेण्यात आला. भारतीय प्रौद्योगिक संस्थेच्या तंज्ञानी क्षेत्रिय भेटी व सखोल अभ्यासअंती प्राधिकरणास प्रस्ताव सादर केला. सदर प्रस्तावास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेऊन मुंब्रा येथील उजव्या बाजूच्या डोंगरकडयाचे संवर्धन करणेबाबत निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कंत्राटदाराची नेमणूक करण्यात यावी असे ठरले. सदर कामाचा वाव खालीलप्रमाणे-

- एकूण ४९५ मी. इतक्या लांबीचे आर.सी.सी. व्दारे बॉक्स प्रकारचे बांधकाम करणे
- सदर बॉक्समधील सिमेंट कॉक्रींट रस्ता व पर्जन्य जलवाहिन्यांचे बांधकाम करणे.
- प्रत्यक्ष काम करण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात डोंगरकडयाच्या बाजूचे संरक्षण करणे.
- आर.सी.सी. बॉक्सच्या स्लॅबवर रिटेनिंग वॉल/ अरेस्ट वॉलचे बांधकाम करणे.
- आर.सी.सी. बॉक्स स्लॅब व अरेस्ट वॉलला टायर लावणे.
- सूचना फलक व रोड मार्किंगचे काम, इ.

९.४ सदर कामासाठी ऑनलाईन ई-निविदा सुचना प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर तसेच इंग्रजी व मराठी दैनिक वृत्तपत्रांमध्ये दिनांक १७/१०/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून ठोक रक्कम पध्दतीवर (Lumpsum) देकार मागविण्यात आले. इच्छुक निविदाकारांसमवेत

निविदापूर्व बैठक दिनांक ०२/११/२०२२ रोजी घेण्यात येऊन त्यांनी बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्यांचा खुलासा व सामाईक बदल संच दिनांक ०३/११/२०२२ रोजी प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आला. निविदाकारांचे ई लिफाफा - 'अ' हे निविदेच्या परिशिष्टानुसार दिनांक १५/११/२०२२ रोजी उघडण्यात आले असून खालील एकूण ३ निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या -

१) मे. वेन्सर कन्स्ट्रक्शन कंपनी लि.
२) मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि
३) मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि.

९. ५ चर्चेदरम्यान असे नमूद करण्यात आले की, वरील सर्व ३ निविदाकारांनी ई - लिफाफा — 'अ' मधील अटींची पूर्तता केल्याचे आढळल्याने त्यासर्वांचे ई- लिफाफा — 'ब' उघडण्यात आले. लिफाफा — 'ब' मध्ये निविदाकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी प्रकल्पाचे सल्लागार मे. पीईएमएस- आकार अभिनव कन्सल्टंट प्रा.लि. यांचेतर्फे करण्यात आली असून, त्यांनी त्यांच्या दिनांक २३/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अहवाल प्राधिकरणास सादर केला. त्यानुषंगाने उपरोक्त कामासाठी मे. वेन्सर कन्स्ट्रक्शन कंपनी लि., मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि व मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांच्या निविदा पात्र होत आहेत. अतिरिक्त महानगर आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २८/११/२०२२ रोजी निविदा शिफारस समितीची बैठक झाली. सदर कामासाठी प्राप्त झालेले व निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता करणारे मे. वेन्सर कन्स्ट्रक्शन कंपनी लि., मे. रेलकॉन इन्फ्रा प्रोजेक्टस लि. व मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि., यांचे आर्थिक देकार (Envelop- C) उघडण्यासाठी निविदा शिफारस समितीव्दारे मान्यता प्राप्त करण्यात आली. तद्नंतर सदर कामाचे आर्थिक देकार '(लिफाफा-क)' दिनांक २८/११/२०२२ रोजी उघडण्यात आलेले आहेत. त्याबाबतचा गोषवारा खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | आर्थिक देकार रक्कम रु. (वस्तू व सेवा कर, प्रोव्हीजनल सम व रॉयल्टी शुल्क वगळून) | दराची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मे. वेन्सर कन्स्ट्रक्शन कंपनी लि. | रु. ९९,९९,९९,९९९/- | ४२.०७% | व्दितीय लघुत्तम |
| २ | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि | रु. १,०५,००,००,०००/- | ४९.१७% | तृतीय लघुत्तम |
| ३ | मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | रु. ९३,७१,००,०००/- | ३३.१३% | प्रथम लघुत्तम |

९.६ उपरोक्त कामाबाबत वरील तपशीलानुसार मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि., यांचा रु.९३,७१,००,०००/- किंमतीचा आर्थिक दर हा निविदेमध्ये नमूद अंदाजित रक्कम रु. ७०,३८,७३,२३६/- (वस्तु व सेवा कर, रॉयल्टी शुल्क व १०% प्रोव्हीजनल सम वगळून) पेक्षा ३३.१३% अधिक इतक्या दराचा देकार लघुत्तम आढळून आला. सदर लघुत्तम देकार हा अंदाजित रक्कमेपेक्षा जास्त असल्याकारणाने मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना जास्त दराबाबत खुलासा करणेकरीता प्राधिकरणाने पत्र क्र. अवि/विस्तारीत एमयुआयपी/ऐकना-१/मे. एन.ए/दर/डोंगर संरक्षण/११७१/२०२२ दिनांक २८/११/२०२२ अन्वये कळविण्यात आले. सदर पत्राच्या अनुषंगाने मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांनी त्यांचे पत्र क्र. NACPL/HO/MMRDA/AKN-I/SLOPE PROTECTION/001 दिनांक ३०/११/२०२२ अन्वये त्यांचे देकाराबाबत खुलासा प्राधिकरणास सादर केलेला आहे. निविदाकाराकडून प्राप्त झालेल्या दराच्या समर्थनाबाबतचे खालील मुद्दे सांगण्यात आले.

१. सदर कामालगत डोंगरकडा व सद्य:स्थितीत प्रगतीपथावर असलेले बोगदयाच्या कामामुळे जागेचा अभाव गृहित धरुन ९ महिन्यांच्या कालावधीमध्ये काम पूर्ण करणे.
२. सदर कामासाठी अतिरिक्त मनुष्यबळ, यंत्रसामुग्री व शटरींग सेट, इ. बाबींची आवश्यकता
३. सदर कामासाठी तात्पुरत्या स्वरुपात डोंगरकडयाचे संरक्षण करणे

सदर स्पष्टीकरणाची प्रकल्प सल्लागाराव्दारे छाननी करण्यात येऊन त्याबाबतचा अहवाल सल्लागाराने दिनांक ०५/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राधिकरणास सादर केलेला आहे. सदर अहवालानुसार उपरोक्त काम हे निविदाकाराकडून ९ महिन्याच्या कालावधीमध्ये पूर्ण करण्यासाठी लागणारे अतिरिक्त मनुष्यबळ, यंत्र व सामुग्री आणि शटरींग सेट, इ. बाबीमुळे निविदाकाराने वरीलप्रमाणे निविदा सादर केली आहे. सदर किंमत हा रु. ९७,६१,९१,६७९/- (वस्तु व सेवा कर, रॉयल्टी शुल्क व प्रोव्हीजनल सम वगळून) इतकी आहे. परंतु त्यांचेमार्फत सदर कामालगत बोगदयाचे काम प्रगतीपथावर असल्यामुळे अंदाजे निविदाकाराने सदर किंमतीवर ४% सूट दिलेली आहे. त्यामुळे सदर कामासाठी मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि., यांचा प्राप्त लघुत्तम देकार रु.९३,७१,००,०००/- (वस्तु व सेवा कर, रॉयल्टी शुल्क व प्रोव्हीजनल सम वगळून)

(३३.१३ % अधिक दराचा) असून तो निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता करणारा तसेच सुसंवादित असल्याचे सल्लागाराने त्यांच्या अहवालात नमूद केलेले आहे. अतिरिक्त महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली 'निविदा शिफारस समिती' दिनांक ०७/१२/२०२२ रोजी बैठक झाली. सदर बैठकीमध्ये लघुत्तम निविदाकार मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांचा प्राप्त देकार रु. ९३,७१,००,०००/- (वस्तु व सेवा कर, रॉयल्टी शुल्क व प्रोव्हीजनल सम वगळून) निविदा रक्कम सापेक्ष ३३.१३ % अधिक दराचा असल्यामुळे, निविदाकारास त्यांचा देकार कमी करणेबाबत त्यांना विनंती करण्यात यावी असे ठरले. त्यानुसार निविदाकारास देकार कमी करणेकरीता प्राधिकरणाचे दिनांक १३/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि यांनी त्यांचे दिनांक २१/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सदर काम रु. ८३,००,००,०००/- (रुपये त्र्याऐंशी कोटी फक्त) (वस्तु व सेवा कर, रॉयल्टी शुल्क व प्रोव्हीजनल सम वगळून) (१७.९१ % अधिक दराने) करणेकरीता तयारी दर्शविलेली आहे.

९.७ अतिरिक्त महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे अध्यक्षतेखाली निविदा शिफारस समितीची दिनांक ०४/०१/२०२३ रोजी बैठक झाली. सदर बैठकीमध्ये निविदाकाराने नमूद केलेल्या सर्व बाबींचा विचार करुन त्यांच्यामध्ये झालेल्या वाटाघाटीनुसार सदर कामासाठीचा देकार रु. ८३,००,००,०००/- (अक्षरी रुपये त्र्याऐंशी कोटी फक्त) (वस्तु व सेवा कर, रॉयल्टी शुल्क व प्रोव्हीजनल सम वगळून) स्विकारण्यास कार्यकारी समितीच्या मंजुरीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४४६:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४चे कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे ऐरोली-कटाई नाका प्रकल्पातील उजव्या बाजूकडील साखळी क्र. ५०३५ मी. ते साखळी क्र. ५५३० मी. या लांबीमध्ये डोंगर कड्याचे संरक्षण करणे (व्दितीय मागणी) या कामाचे बांधकाम (Lumpsum) ठोक रक्कम पध्दतीवर करावयाच्या प्रस्तावित कामासाठी मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचा वाटीघाटी पश्चात रु. ८३,००,००,०००/- (वस्तु व सेवा कर, रॉयल्टी शुल्क व प्रोव्हीजनल सम वगळून) (रुपये त्र्याऐंशी कोटी फक्त)

इतक्या रक्कमेचा सुधारित देकार अंदाजित रक्कम रु. ७०,३८,७३,२३६/- (वस्तु व सेवा कर, रॉयल्टी शुल्क व प्रोव्हीजनल सम वगळून) पेक्षा १७.९१% टक्के अधिक दराने स्विकारण्यास व करारनाम्यातील अटी इत्यादीच्या अधिन राहूनअधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

“**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र. १०: कटाई नाका-ऐरोली रस्त्यावरील बोगद्यांमध्ये डिझाईन, इंजिनियरिंग, पुरवठा, स्थापना, चाचणीसह आवश्यक सेवासुविधांच्या निर्मितीच्या कामाची लघुत्तम निविदा स्वीकारणेस मान्यता मिळणेबाबत.**

१०.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातंर्गत रस्त्याचे बांधकाम व रूंदीकरण तसेच पुलांची कामे हाती घेण्याचे ठरले. यामध्ये ऐरोली ते कटाई नाका या एकूण १२.३ कि.मी. लांबीच्या प्रकल्पाचा अंतर्भाव होता. प्राधिकरणाच्या दि.२७/०६/२०१४ रोजी झालेल्या १३४ व्या बैठकीत सदर प्रकल्पासाठी एकूण रू.९४४.२० कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर प्रकल्पाच्या एकूण १२.३ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे विकसन योग्यप्रकारे होण्याच्या दृष्टीने प्रकल्प ३ भागात विभागण्यात आला असून, त्यातील भाग क्र.१ ठाणे बेलापूर रस्ता व राष्ट्रीय महामार्ग क्र.४ असा एकूण ३.५० कि.मी. लांबीचा असून, भाग-२ मुलुंड ऐरोली पूल ते ठाणे बेलापूर रस्ता असा एकूण २.५७ कि.मी. लांबीचा आहे. सद्य:स्थितीत भाग-१ अंतर्गत उन्नत मार्गाचे ८८% व बोगदा व रस्त्याचे काम ६६%, तसेच भाग-२ चे काम ६३% पूर्ण झाले असून, उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. तसेच सदर ऐरोली कटाई नाका भाग-१ व २ या प्रकल्पाच्या कामासाठी वाढीव रू.१४४१.३९ कोटी इतक्या खर्चाच्यां रक्कमेस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि.२०/१०/२०२२ रोजी झालेल्या १५३ व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. भाग-१ साठी तांत्रिकदृष्ट्या मंजूर अंदाजपत्रकामध्ये विद्युत, अग्निसुरक्षा आणि वायुवीजन प्रणालीसाठी रू.६६,००,००,०००/- ची तरतूद आहे.

१०.२ याबाबत अशी चर्चा करण्यात आली की, मुंबई, ठाणे व नवी मुंबई शहरातील वाहतुक कोंडी कमी करण्याबरोबरच विकास करण्याच्या दृष्टीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात येणाऱ्या प्रस्तावित प्रकल्पांचा सुसाध्यता अहवाल (Feasibility Report) व सविस्तर प्रकल्प अहवाल (Detail Project Report) करणेकामी सल्लागारांची नेमणूक करून घेणेस मान्यता देणेबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि.२०/१०/२०२२ रोजी झालेल्या १५३ व्या बैठकीत रू.१७,२१४.७२ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर मान्यतेमध्ये ऐरोली कटाई नाका रस्ता प्रकल्पांतर्गत भाग-३ हा राष्ट्रीय महामार्ग क्र.४ ते कटाई नाका असा एकूण ६.२९ कि.मी. लांबीचा रस्ता आहे. सदर कामासाठी रू.१७७०.०० कोटी इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीचा अंतर्भाव आहे.

१०.३ तसेच ऐरोली-कटाई नाका भाग-१ मधील बोगद्यांमध्ये डिझाईन, इंजिनिअरिंग, पुरवठा, स्थापना, चाचणी सह आवश्यक सेवा-सुविधांच्या निमिर्तीच्या कामाच्या अंतर्गत विद्युत संच मांडणी, बोगद्या बाहेरील जवळपासची पथदिवे, बोगद्यातील सीसीटीव्ही यंत्रणा, सिग्नल यंत्रणा, सार्वजनिक उद्घोषणा व दुरध्वनी प्रणाली, वायुविजन यंत्रणा, वॉटर मिस्ट प्रकारची व पारंपारिक अग्निशमन व अग्निसूचक यंत्रणा अद्यावत बीएमएस सिस्टीमसह बसविण्याचा समावेश आहे. काम पूर्ण झाल्यानंतर एक वर्ष कालावधीसाठी या यंत्रणा चालविण्यासाठी आवश्यक तो कुशल तंत्रज्ञ वर्ग नेमण्याचा ही कंत्राटामध्ये समावेश आहे. त्यानुसार सदर कामाच्या ई-निविदा सुचना प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर, तसेच टाईम्स ऑफ इंडिया व लोकसत्ता या वृत्तपत्रांमध्ये दि.०९.०६.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली. निविदा रक्कम रू.५७.९५ कोटी अधिक वस्तू व सेवाकर इतकी होती. या 'ई' निविदा सुचनेनुसार निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दि.२९.०६.२०२२ होती, परंतु ही तारीख दि.१७.०८.२०२२ पर्यंत आणि त्यानंतर इच्छुक निविदाकारांच्या विनंतीनुसार दि.३०.०८.२०२२ पर्यंत वाढविण्यात आली होती. परंतु ही निविदा बंद करताना निविदेला प्रतिसाद मिळाला नसल्याचे आढळून आले. तद्नंतर या कामाचे सल्लागार मे. स्टुप कंन्सलटंट यांनी या कामाचे अंदाजपत्रक जुन्या दरपत्रकांवर आधारीत असल्याने, तसेच अग्निशमन व अग्निसूचक यंत्रणेचा काही भाग, बोगद्यामधील सिग्नल यंत्रणेचा काही भाग, पथदिवे त्याचप्रामणे सदर यंत्रणेची एक वर्षाकरीता देखभाल व दुरूस्ती करणे ह्या बाबी अंदाजपत्रकात समाविष्ठ नसल्याने त्यांनी ₹७७.५९ कोटी (वस्तू व सेवा कर, प्रोव्हीजनल सम १०% व रॉयल्टी शुल्क वगळून) रक्कमेचे सुधारित अंदाजपत्रक २०२१-२२ च्या

दरपत्रकानुसार सादर केले.त्यानुसार महानगर आयुक्त यांच्या दि.०८.०९.२०२२ रोजीच्या आदेशानुसार या कामासाठी दुसऱ्या मागणीसाठी निविदा सूचनेस मंजूरी मिळालेली असून, निविदा सुचना दि.०९.०९.२०२२ रोजी महाराष्ट्र टाईम्स व इंडियन एक्सप्रेस वर्तमानपत्रात आणि वेबसाईटवर प्रकाशित करण्यात आली. या कामासाठी निविदापूर्व बैठक दि.१४.०९.२०२२ रोजी झाली. सदर बैठकीत निविदाकारांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा खुलासा दि.२९.०९.२०२२, दि.३०.०९.२०२२ व दि.१२.१०.२०२२ रोजी प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला. या कामाच्या प्राप्त झालेल्या निविदांचा लिफाफा 'अ' दि.१८.१०.२०२२ रोजी उघडण्यात आला असता, एकूण २ निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्याचे आढळले. त्यांची नावे खालीलप्रमाणे -

१. मे. स्टर्लिंग ॲन्ड विल्सन प्रा. लि.

२. मे. युनिवर्सल एमईपी प्रोजेक्ट ॲन्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस लि.

१०.४ वरील २ निविदाकारांनी ई-लिफाफा-'अ' मधील अटींची पूर्तता केल्याचे आढळल्याने त्यांचे ई-लिफाफा-'ब' उघडण्यात आले. ई-लिफाफा-'ब' मध्ये निविदाकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी प्रकल्पाचे सल्लागार मे. स्टुप कंन्सल्टंट प्रा. लि. यांचेतर्फे करण्यात आली व त्यानुसार अहवाल तयार करून, सदर अहवाल निविदा शिफारस समितीच्या दि.०२.११.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत सादर करण्यात आला. सदर अहवाल निविदा शिफारस समितीने मान्य करून दोन्ही निविदाकारांचे आर्थिक देकाराचा ई-लिफाफा ‘क’ उघडण्याची शिफारस केली.

१०.५. सदर निविदाकारांचे आर्थिक देकार ई-लिफाफा ‘क’ दि.०२.११.२०२२ रोजी उघडण्यात आले असून, त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | आर्थिक देकार रक्कम (रू.) (वस्तू व सेवा कर, प्रोव्हीजनल सम व रॉयल्टी शुल्क वगळून) | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मे. युनिवर्सल एमईपी प्रोजेक्ट ॲन्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस लि. | रू.९२,४०,९७,४९९/- (+१९.१०%) | प्रथम लघुत्तम |
| २. | मे. स्टर्लिंग ॲन्ड विल्सन प्रा. लि. | रू.९५,४८,२३,१५९/- (+२३.०६%) | व्दितीय लघुत्तम |

वरील तपशिलानुसार मे. युनिवर्सल एमईपी प्रोजेक्ट ॲन्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस लि. यांचा रू.९२,४०,९७,४९९/- किंमतीचा प्रथम लघुत्तम आर्थिक देकार निविदेमध्ये नमुद अंदाजित किंमतीच्या १९.१०% अधिक दराचा आढळून आला. सदर लघुत्तम देकार हा अंदाजित रक्कमेपेक्षा जास्त असल्यामुळे निविदा शिफारस समितीच्या दि.१८.११.२०२२ रोजीच्या बैठकीत घेऊन निविदाकारास त्याच्या देकाराबाबत समर्थन देण्याची विनंती करण्यात आली. त्यानुसार निविदाकाराने समर्थन सादर केले व त्याची छाननी प्रकल्पाचे सल्लागारामार्फत करण्यात आली. त्यानंतर निविदाकारास वाटाघाटीस बोलविण्यात आले. वाटाघाटीदरम्यान निविदाकाराने त्याच्या देकार रक्कमेत ३% सवलत दिली व सदर कामाकरीता ₹८९,६३,७४,५७४/- इतक्या रक्कमेचा सुधारीत देकार सादर केला. सदर निविदाकाराने त्याच्या निविदा देकाराच्या समर्थनार्थ सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी करताना खालीलप्रमाणे अंदाजपत्रकापेक्षा जास्त खर्च गृहित धरलेला आहे.

i. या कामासाठी सुमारे ५०% रक्कमेच्या वस्तू ह्या परदेशातून आयात कराव्या लागणार आहेत. त्याकामी आयात शुल्क, वाहतुक खर्च, जुलै २०२२ नंतरची डॉलरची किंमत वाढ, कस्टम क्लिअरन्स चार्जेस, बॅक चार्जेस इत्यादी.

ii. काम करणेसाठी विज, पाणी इ. साठी व त्यानंतर १ वर्षासाठी अनुभवी व कुशल तंत्रज्ञ नेमणे इत्यादी.

iii. नियमानुसार कंत्राटासाठी इन्श्युरन्स पॉलीसीकरिता इत्यादी.

iv. बँकेकडून घ्याव्या लागणाऱ्या रोख प्रवाह रकमेवरील व्याज इत्यादी.

v. कंत्राट तरतुदी नुसार वार्षिक देखभाल करण्याकरीता द्यावयाचे सुटे भाग व हमी कालावधी मधील अपेक्षित अतिरिक्त खर्च, तुटफूट इत्यादी.

vi. सविस्तर नियोजन, आराखडे व विशेषज्ञ सल्लागार (स्पेशालिस्ट कंन्सल्टंट) सेवा इत्यादी.

वरील प्रमाणे रू.१४.८० कोटी अतिरिक्त खर्चाचा अंतर्भाव करुन रू.९४,४०,९७,४९९/- रकमेची निविदा कंत्राटदाराने सादर केली आहे. या रकमेवर ३% सुट दिल्याने देकाराची रक्कम ₹८९,६३,७४,५७४/- अंदाजित किंमतीच्या १६.१०% अधिक आहे.

वरील सर्व बाबींच्या समर्थनार्थ सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी करून प्रकल्प सल्लागार मे. स्टुप यांनी प्राप्त सुधारीत देकार डिझाईन-बिल्ड प्रकारचा व काम पूर्ण करण्यासाठी सर्व बाबींचा अंतर्भाव असल्याने तो स्विकारण्या योग्य असल्याचे कळविलेले आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र. १४४७:</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभुत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत कटाई नाका-ऐरोली रस्त्यावरील बोगद्यांमध्ये डिझाईन, इंजिनिअरिंग, पुरवठा, स्थापना, चाचणीसह आवश्यक सेवा-सुविधांची निर्मिती करणेच्या कामासाठी मे. युनिवर्सल एमईपी प्रोजेक्ट ॲन्ड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस लि. यांचा ₹८९,६३,७४,५७४/- (वस्तू व सेवा कर, प्रोव्हीजनल सम व रॉयल्टी शुल्क वगळून) अंदाजित किंमतीच्या १६.१०% अधिक इतक्या किंमतीचा देकार स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणारी भाववाढ इ. अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**<u>बाब क्र. ११: मालवणी, मुंबई येथील मेट्रो डेपोत कर्मचारी निवासस्थानांच्या बांधकामामधील अतिरिक्त कामांमुळे होणाऱ्या वाढीव खर्चास मंजूरी देणेबाबत.</u>**

११.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मालवणी व मंडाळे येथील कर्मचारी निवासस्थानांच्या आर्किटेक्चरल, स्थापत्य नियोजन व बांधकाम पर्यवेक्षण इ. कामांसाठी सल्लागार मे. टीम वन इंडिया प्रा.लि., यांना दिनांक ०५/०४/२०१८ रोजी नियुक्त करण्यात आले होते. सदर कामाची निविदा बनविणे, त्याचा अंदाजपत्रक बनविणे, निविदेची तांत्रिक छाननी इ. कामे सल्लागारामार्फत करण्यात आली आहेत. तसेच मालवणी व मंडाळे येथील कर्मचारी निवासस्थानांच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे. आर्किटेक्ट युनायटेड यांना दिनांक १९/०४/२०२१ रोजी स्विकृतीपत्र देण्यात आले. मालवणी, मुंबई येथील

मेट्रो डेपोत कर्मचारी निवासस्थानांच्या बांधकामासाठी मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांनी सादर केलेल्या रु.७८,५७,११,०३८.१६ (७.८३% कमीचा) आर्थिक देकारास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ३०/०४/२०२० रोजी झालेल्या २६५ व्या बैठकीत मान्यता देण्यात आली होती. त्याअनुषंगाने मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांना दिनांक १४/०५/२०२० रोजी स्विकृतीपत्र देण्यात आले असून, मालवणी येथे कर्मचारी निवासस्थानाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे:

| निवासस्थानाचा प्रकार | चटई क्षेत्रफळ | | एकूण निवासस्थानाची संख्या |
|---|---|---|---|
| | चौ.फुट | चौ.मी | |
| १ BHK | ६५७ | ६१.०५ | ७८ |
| २ BHK | ८८५ | ८२.२५ | ७८ |
| ३ BHK | १३३२ | १२३.७९ | ३८ |
| एकूण | | | १९४ |

११.२ याबाबत अशी चर्चा करण्यात की, मालवणी, मुंबई येथील मेट्रो डेपोतील कर्मचारी निवासस्थानांचे संरचनात्मक रेखाचित्रे (Structural Drawings) भारतीय तंत्रज्ञान संस्था मुंबई (IIT Bombay) यांना मान्यतेसाठी पाठविण्यात आली होती. सदर मान्यतेच्या पत्रात भारतीय तंत्रज्ञान संस्था मुंबई (IIT Bombay) यांनी काही बदल करुन प्रस्तावास मान्यता दिली. त्यातील काही बदल खालीलप्रमाणे : -

अ) Minimum grade of concrete to be M40 instead of M30 for all structural elements.

ब) Number of piles for 1BHK increased from 63 to 100, for 2BHK it is increased from 95 to 120 & 3BHK it was increased from 59 to 113.

क) Grade of concrete piles is also increased to M40 from M30

ड) From durability considerations minimum diameter of 16MM in columns and a cushion of about 15% in reinforcement to account for vagaries in-situ conditions is to be taken.

ई) No lapping is to be done and couplers should be provided at all location.

तसेच सदर प्रकल्प पर्यावरण विभागाच्या परवानगीस सादर केल्यानंतर त्यांनी या प्रकल्पासाठी मालवणी डेपो व्यतिरिक्त वेगळे सांडपाणी प्रक्रिया संयंत्र (STP), छतावरती High Albedo Paint व FRP Louvers बसविण्याची सुचना केली. भारतीय तंत्रज्ञान संस्था मुंबई (IIT Bombay), पर्यावरण विभागाची परवानगी व प्रस्तावित मालवणी कर्मचारी निवासस्थानांच्या जागेवर असणारी अतिरिक्त माती उचलण्यासाठी रु. १४.९४ कोटी (कंत्राटापेक्षा १९.०२% अधिक) इतक्या रकमेस यापुर्वी प्राधिकरणातर्फे मान्यता देण्यात आलेली आहे.

११.३ मालवणी, मुंबई येथील मेट्रो डेपोतील कर्मचारी निवासस्थानांच्या स्थळ पाहणी दरम्यान मुंबई मधील जागेची अनुपलब्धता लक्षात घेता जास्तीत जास्त FSI चा वापर करुन मालवणी येथील कर्मचारी निवासस्थानांच्या जागेचा पुर्ण Layout सुधारीत करुन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारास अहवाल जमा करण्याचे निर्देश दिले. त्याअनुषंगाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी विविध पर्याय प्राधिकरणास सादर केले. या पर्यायांपैकी खालील पर्याय प्राधिकरणाने तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या शिफारस केला आहे.

अ) १ BHK व २ BHK इमारतीचे बांधकाम सुरु असल्याने सदर इमारतीत सद्य:स्थितीत काहीही बदल करणे शक्य नसल्याने तसेच कंत्राटाप्रमाणे प्रस्तावित ३ BHK इमारतीत २ flats प्रत्येक मजल्यावरती असे २० मजल्यापर्यंत असे होते. त्यात बदल करुन प्रत्येक मजल्यावरती ४ flats व ३७ मजल्यासाठी आवश्यक असणारा पाया (Foundation) व २० मजल्यापर्यंत बांधकाम सद्याच्या कंत्राटात करुन उर्वरीत मजल्यांचे बांधकामासाठी वेगळ्या निविदा मागविण्यात येतील.

ब) ४ Flats प्रत्येक मजल्यावर अशी ४२ मजल्याची इमारत वेगळ्या निविदा मागवून बांधकाम करणे

क) सुमारे ३४२ कार पार्किंगसाठी १४ मजली इमारतीचे बांधकाम करणे.

वरील सर्व बाबी लक्षात घेता, आवश्यक मनुष्यबळास कर्मचारी निवासस्थाने पुरविणे, नविन कर्मचारी निवासस्थानांकरिता सद्य:स्थितीत जागेच्या अनुपलब्धतेमुळे, व मालवणी कार डेपो केंद्रस्थानी असणे इत्यादी बाबींमुळे मालवणी येथील कर्मचारी निवासस्थानाच्या सद्यकंत्राटात रु. ८८.३३ कोटी (११२.४२%) कंत्राटापेक्षा अधिक रक्कम कंत्राटात प्रस्तावित ३BHK इमारतीत

.. ३५/-

प्रत्येक मजल्यावरती ४ flats व ३७ मजल्यासाठी आवश्यक असणारा पाया (Foundation) व २० मजल्यापर्यंत बांधकाम करणे प्रस्तावित आहेत. प्रस्तावित काम या कंत्राटामधून करुन घेतल्यास एकूण रक्कम रु. १०३.२७ कोटी (१३१.४३%) इतके अतिरिक्त रक्कमेचे काम होणार आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर,** कार्यकारी समितीने उपलब्ध FSI चा अधिकाधीक वापर करण्यासाठी तसेच मेट्रो कर्मचा-यांसाठी कर्मचारी निवासस्थानांची अनुलब्धता लक्षात घेता, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १४४८:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३ व ५) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभुत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मालवणी, मुंबई येथील कर्मचारी निवासस्थानाच्या कंत्राटात नमूद नसलेल्या अतिरिक्त बाबी (Extra Items) व कंत्राटात नमूद असणारा बाबींच्या वाढीपोटी (Excess Quantities) मंजुर रकमेच्या ११२.४२% रु.८८.३३ कोटी व महानगर आयुक्त यांनी मान्यता देण्यात आलेले रु. १४.९४ कोटी (कंत्राटापेक्षा १९.०२% अधिक) असे एकूण रक्कम रु. १०३.२७ कोटी (१३१.४३%) इतक्या अतिरिक्त खर्च मंजुर करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहेत."

**बाब क्र. १२ : पूर्व द्रुतगती महामार्गावर ठाणे शहरातील आनंदनगर ते साकेत पर्यंतच्या उन्नत मार्गाचे बांधकाम करणेच्या प्रकल्पाकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नेमणूक करणेबाबत.**

१२.१ या प्रस्ताबाबात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, पूर्व द्रुतगती महामार्गावरील मुंबई शहराची सीमा मुलुंड येथे ओलांडल्यानंतर ठाणे शहरात आनंद नगर येथे प्रवेश केला जातो. तदनंतर ठाणे शहराच्या मध्यवर्ती भागातून मार्गक्रमण करुन साकेत गृहसंकुलाजवळ ठाणे शहराची सीमा ओलांडल्यानंतर याच महामार्गाचे पुढे राष्ट्रीय महामार्ग क्र. १६० मध्ये (मुंबई आग्रा महामार्ग) रुपांतर होते. ठाणे शहरातून जातांना या महामार्गावर

ठाणे शहरातील अंतर्गत वाहतूक तसेच महामार्गावरील बाह्य वाहतुकीची सरमिसळ होते. त्यामुळे या भागात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे, या समस्येवर उपाययोजना करणे आवश्यक आहे.

१२.२ चर्चेस अनुसरुन असे नमूद केले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई महानगर प्रदेशाच्या भविष्यातील सर्वंकष वाहतुकीचा अभ्यास करण्यासाठी मे. ली असोसिएटस यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली. या सल्लागाराने वर नमूद केल्याप्रमाणे ठाणे शहरातील पूर्व द्रुतगती महामार्गावरील भविष्यात होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्येवर उपाययोजनेचा अभ्यास केला. त्या अनुषंगाने सल्लागारांनी पूर्व द्रुतगती महामार्गावरील ठाणे शहरातील आनंद नगर ते साकेत या भागात उन्नत मार्ग सुचविला आहे. या उन्नत मार्गामुळे ठाणे शहराबाहेरील मुंबई ते राष्ट्रीय महामार्ग क्र. १६० वरील वाहतूक ठाणे शहरांतर्गत महामार्गावरील प्रस्तावित उन्नत मार्गावरुन होईल. त्यामुळे शहरांतर्गत वाहतुकीत होणारी सरमिसळ व त्या अनुषंगाने होणारी वाहतूक कोंडी व अपघातांचे वाढीव प्रमाण टाळता येऊ शकेल.

१२.३ सदर उन्नत मार्गाची लांबी ६.३० कि.मी इतकी असून या प्रकल्पाकरीता ढोबळ मानाने ₹. १६०० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. त्यास येणाऱ्या अंदाजित खर्च ₹. १६०० कोटी यांस प्राधिकरणाने दि. २६/११/२०२१ रोजी पार पडलेल्या १५१ व्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. प्रस्तावाचा सविस्तर अभ्यास करणे, अंदाजपत्रक तयार करणे, निविदा प्रक्रियेत सहाय्य करणे तसेच प्रकल्पाचे पर्यवेक्षण करणे याकरीता सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

१२.४ सदर कामाच्या निविदे प्रक्रियेबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, सदर कामाकरीता सल्लागार नियुक्तीसाठी ई-निविदा प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर व वर्तमानपत्रात दि. ०३.१०.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली. निविदा सादर करण्याची अंतिम दि. ०१.११.२०२२ पर्यंत होती. निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत ११ निविदाकारांनी त्यांच्या निविदा सादर केल्या होत्या.

प्राप्त निविदांचे **लिफाफा 'अ'** आणि **'ब'** दि. ०४.११.२०२२ रोजी उघडण्यात आला. प्राप्त निविदांपैकी मे. आकार अभिनव कन्सल्टंट प्रा.लि. व मे के.एन.जे. सह कंम्पोझिट कंम्बाईन टेक्नोक्राटस यांनी निविदेमध्ये नमूद केलेल्या मागील सात वर्षात पूर्ण केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कामाचे अनुभवाचे निकष पूर्ण केले नाहीत. तसेच १) मे. टेक्नोजेम कन्सल्टंट प्रा.लि. सह जिओ डिझाईन आणि रिसर्ज प्रा.लि. २) मे. फोर्टेस इन्फ्राकॉन लि सह मे. हिल इंटरनॅशनल ३) मे. एस.ए. इन्फ्रास्टक्चर सह उपम इंटरनॅशनल कॉर्पोरेशन आणि इन्फ्रा सह डिझाईन स्टुडिओ प्रा.लि. ४) मे. श्रीखंडे कन्सल्टंट सह मॅप्स ग्लोबल सिव्हिल टेक्स प्रा.लि. आणि ५) मे. स्पेक्ट्रम कन्सल्टंट सह हेक्झा प्रा. जॉईट स्टोक यांनी निविदेत नमूद केलेले मनुष्यबळ त्यांचेकडे नियमित सेवेत उपलब्ध नसल्यामुळे सदर निविदाकार अपात्र ठरले. अंतिमत: खालील ४ निविदाकार निविदा प्रक्रियेत पात्र झाल्या आहेत.

१) मे. लायन इंजिनिअरींग

२) मे. टि.पी.एफ कन्सल्टंट

३) मे. सेगमेंटल कन्सल्टिंग अँड प्रा.लि. सह मे. सोवेल लि.

४) मे. मोनार्च सर्वेअर्स सह मे. रोडीक कन्सल्टंट

पात्र निविदाकारांचा आर्थिक प्रस्ताव **लिफाफा 'क'** दि. २३/१२/२०२२ रोजी उघडण्यात आले.

१२.५ प्राप्त झालेल्या आर्थिक देकारांची महानगर आयुक्त यांनी पुढीलप्रमाणे माहिती सादर केली आहे :-

| अ.क्र | निविदाकारांचे नाव | तांत्रिक गुण | आर्थिक देकार (रु) | संयुक्त बोली | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. लायन इंजिनिअरींग | ९६.५० | १५,९४,४६,२५०/- | ९७.२० | प्रथम लघुत्तम |
| २ | मे. टि.पी.एफ कन्सल्टंट | ९३.७५ | १७,३६,७३,०००/- | ९३.३६ | द्वितीय लघुत्तम |
| ३ | मे. सेगमेंटल कन्सल्टिंग अँड प्रा.लि. सह मे. सोवेल लि. | ९३.३५ | २३,९५,३०,०००/- | ८८.०१ | तृतीय लघुत्तम |
| ४ | मे. मोनार्च सर्वेअर्स सह मे. रोडीक कन्सल्टंट | ९०.६० | २४,०८,४३,०००/- | ८५.७२ | चतुर्थ लघुत्तम |

वरील एकत्रित तुलनात्मक तक्त्यावरून असे दिसून येते की मे. लायन इंजिनिअरींग या निविदाकाराने एकत्रित तांत्रिक आणि वित्तीय स्कोअर सर्वाधिक मिळवले आहेत आणि अशाप्रकारे सर्व ४ सल्लागारांमध्ये प्रथम क्रमांकावर आहे. तांत्रिक मुल्यमापनातून असे दिसून येते की, मे. लायन इंजिनिअरींग यांचेकडे पुरेसे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध असून त्यांना अशाप्रकारच्या कामांचा पुर्वानुभव आहे.

प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या दि. २२.१२.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत निविदेबाबत सविस्तर चर्चा झाली असून, मे. लायन इंजिनिअरींग यांनी सादर केलेला आर्थिक देकार रू.१५,९४,४६,२५०/- (रुपये पंधरा कोटी चौऱ्याण्णव लाख शेहचाळीस हजार दोनशे पन्नास फक्त) (वस्तू व सेवा कर वगळून) स्विकाहार्य असल्याचा अभिप्राय दिला आहे. निविदा समितीने सदर प्रकरण कार्यकारी समितीच्या मंजुरीकरीता अग्रेषित करण्याची शिफारस केली.

१२.६ चर्चेनंतर, पूर्व द्रुतगती महामार्गावरील ठाणे शहरातील आनंदनगर ते साकेत पर्यंतच्या उन्नत मार्गाचे बांधकाम करणेच्या प्रकल्पाकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नेमणूक करणे या कामी प्राप्त झालेली मे. लायन इंजिनिअरींग यांची रू.१५,९४,४६,२५०/- (रुपये पंधरा कोटी चौऱ्याण्णव लाख शेहचाळीस हजार दोनशे पन्नास फक्त) (वस्तू व सेवा कर वगळून) रक्कमेची निविदा कार्यकारी समितीच्या मंजुरीसाठी सादर केली.

**निर्णय : चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४४९:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३) चे पोट कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे पूर्व द्रुतगती महामार्गावरील ठाणे शहरातील आनंदनगर ते साकेत पर्यंतच्या उन्नत मार्गाचे बांधकाम करणे, या प्रकल्पाकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूकीसाठी

.. ३९/-

मे. लायन इंजिनिअरींग यांची रू.१५,९४,४६,२५०/- (रुपये पंधरा कोटी चौऱ्याण्णव लाख शेहचाळीस हजार दोनशे पन्नास फक्त) (वस्तू व सेवा कर वगळून) रक्कमेची निविदा स्वीकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती फेरबदलसह पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. १३: प्राधिकरणाचे दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

१३.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० स्टेंबर, २०२२ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत कार्यकारी समितीस माहिती दिली.

१३.२ त्यानंतर प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेखांची नोंद घेऊन लेख्यांस कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**बाब क्र. १४ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल : दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२२ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२२**

१४.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक १ ऑक्टोबर, २०२२ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ दरम्यान केलेल्या गुंतवणूकीची कार्यकारी समितीस संक्षिप्त माहिती दिली.

१४.२ त्यानंतर कार्यकारी समितीने दिनांक १ ऑक्टोबर, २०२२ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंतच्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेतली.

**बाब क्र.१५ : मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल दिनांक ०१ एप्रिल, २०२२ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२२**

१५.१ महानगर आयुक्त यांनी मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधीबाबत कार्यकारी समितीस संक्षिप्त माहिती दिली.

१५.२ त्यानंतर दिनांक ०१ एप्रिल, २०२२ ते ३० सप्टेंबर, २०२२ रोजीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय : मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

.. ४०/-

**बाब क्र.१६ : विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत (Extn. MUIP) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील नव्याने मंजुर झालेल्या भाग-१ व भाग-२ च्या कामांसाठी कंत्राटदाराची नेमणूक करणे.**

१६.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाअंतर्गत रस्त्यांची बांधकामे व रुंदीकरणाची कामे हाती घेण्याचे ठरले. यामध्ये उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील नव्याने मंजूर झालेल्या एकूण ०७ रस्ते सिमेंट कॉंक्रीट करणे या कामांचा अंतर्भाव होता.

१६.२ तत्कालीन मा. नगरविकास मंत्री व अध्यक्ष, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांनी विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (Extd. MUIP) योजनेअंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका (UMC) क्षेत्रातील एकुण ०७ रस्त्यांच्या कामांसाठी दि. २२/०२/२०२१ व दि. ०१/०६/२०२१ रोजी रु. १५१.६० कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

१६.३ चर्चेस अनुसरुन असे नमूद केले की, सदरच्या कामांमध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्त्याच्या दोन्ही बाजूला पर्जन्य जलवाहिन्या (Storm water drain), पदपथ, डांबराचा फ्लेक्सिबल शोल्डर, सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम प्रस्तावित करण्यात आले आहे. फ्लेक्सिबल शोल्डरमध्ये सेवावाहिन्यांसाठी सोय करण्यात आली आहे व प्रत्येकी २०० मीटर वर क्रॉस पाईप व डक्ट देण्यात आले आहेत.

१६.४ सदर कामासाठी ऑनलाईन ई-निविदा सुचना उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील सिमेंट कॉंक्रीट रस्त्याच्या बांधकामाच्या कामासाठी कंत्राटदार नेमण्यासाठी भाग- १ व ३ करीता ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. ई-निविदा सूचना १३/१२/२०२२ रोजी मुंबई चौफेर आणि फ्रि प्रेस जर्नल या वृत्तपत्रांमध्ये आणि mahatenders.gov.in या वेबसाइटवर दि. १३/१२/२०२२ रोजी प्रकाशित करण्यात आले होते. दि. २३/१२/२०२२ रोजी निविदापुर्व बैठक नियोजित करण्यात आली होती. सदर निविदा पुर्व बैठकीत ८ इच्छुक निविदाकार उपस्थित होते. सदर बैठकीत उपस्थित झालेले मुद्दे व लेखी स्वरुपात उपलब्ध झालेले मुद्दे अशा सर्व मुद्यांचे एकत्रितपणे निराकरण करुन स्पष्टीकरणाचा सामान्य संच (Common set of clarification) व सामान्य संच विचलन (Common set of Deviation) https://mahatenders.go.in संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आले.

१६.५ भाग -१ व २ करीता खालीलप्रमाणे निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या :-

**भाग- १**

| अ.क्र. | निविदाकार |
|---|---|
| १. | मे. निखिल कंन्स्ट्रक्शन ग्रूप प्रा.लि. |
| २. | मे. आर.पी.एस कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. |
| ३. | मे. एन.ए. कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. |

**भाग - २:**

| अ.क्र. | निविदाकार |
|---|---|
| १. | मे. आर.पी.एस कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. |
| २. | मे. जयहिंद रोड बिल्डर्स |
| ३. | मे. एन.ए. कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. |
| ४. | मे. निखिल कंन्स्ट्रक्शन ग्रूप प्रा.लि. |

वरील सर्व भाग -१ व भाग -२ मधील निविदाकारांनी ई-लिफाफा – १ मधील अटींची पूर्तता केल्याचे आढळले. लिफाफा - १ मध्ये निविदाकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी प्रकल्पाचे सल्लागार यांचे तर्फे करण्यात आली असून त्यांनी त्यांच्यामार्फत तांत्रिक मूल्यमापन अहवाल प्राधिकरणास सादर केला. अतिरिक्त महानगर आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २४/०१/२०२३ रोजी निविदा शिफारस समितीची बैठक झाली. सदर कामासाठी प्राप्त झालेले व निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता करणारे कंत्राटदार यांचे आर्थिक देकार (लिफाफा - २) उघडण्यासाठी निविदा शिफारस समितीव्दारे मान्यता प्राप्त करण्यात आली. तद्नंतर सदर कामाचे आर्थिक देकार (लिफाफा- २) दिनांक ३१/०१/२०२३ रोजी उघडण्यात आलेले आहेत. त्याबाबतचा गोषवारा खालीलप्रमाणे -

**भाग - १:**

| अ.क्र. | निविदाकार | सादर आर्थिक देकार (₹) |
|---|---|---|
| १. | मे. निखिल कंन्स्ट्रक्शन ग्रूप प्रा.लि. | ४८,२९,५७,४४४.७०९ (- ०.२००%) – L१ |
| २. | मे. आर.पी.एस कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ४९,३६,०३,८०१.२०६ (२.००%) – L२ |
| ३. | मे. एन.ए. कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ५१,२९,६०,८१३.०१८ (६.००% ) – L३ |

भाग – २:

| अ.क्र. | निविदाकार | सादर आर्थिक देकार (₹) |
| --- | --- | --- |
| १. | मे. एन.ए. कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ४७,६७,३८,८६६.३१३ (३.०० %) - L१ |
| २. | मे. आर.पी.एस कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ४९,९८,८१,५२९.७२६ (८.००%) – L२ |
| ३. | मे. निखिल कंन्स्ट्रक्शन ग्रूप प्रा.लि. | भाग १ च्या कामामध्ये लघुत्तम निविदाकार असल्यामुळे निविदेतील अटीनुसार आर्थिक देकार उघडण्यात आलेले नाही. |

१६.६ अतिरिक्त महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे अध्यक्षतेखाली निविदा शिफारस समितीची दिनांक ०८/०२/२०२३ रोजी बैठक झाली. सदर बैठकीमध्ये निविदाकाराने नमूद केलेल्या सर्व बाबींचा विचार करुन सदर कामासाठीचा निविदेचा देकार स्विकारण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यकारी समितीच्या मंजुरीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे.

| भाग | निविदाकार | सादर आर्थिक देकार (GST वगळुन) (रू.) | युटीलिटी शिफ्टींग (रू.) | रॉयल्टी (रू.) | एकूण (रू.) |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | मे.निखिल कंन्स्ट्रक्शन ग्रूप प्रा.लि. | ४८,२९,५७,४४४ | ३,८७,१३,९३९ | ७,७२,४७५ | ५२,२४,४३,८५८.७१ (निविदा रक्कमेचा दर ) |
| २. | मे. एन. ए. कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ४६,२८,५३,२६८ | ३,७०,२८,१९५ | १७,४३,४०२ | ५०,१६,२४,८६५.०० (निविदा रक्कमेचा दर)कंत्राटदारामार्फत मूळ किंमतीवर ज्यादा 3.00% दर भरल्यामुळे सदर कंत्राटदारास दर कमी करण्यासाठी कळविण्यात आले होते, त्यानुसार कंत्राटदाराने सदर काम वाटाघाटी पश्चात मूळ किंमतीत (AT PAR) करण्याचे मान्य केले. |

**निर्णय : चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

ठराव क्र. १४५०:

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे उल्हासनगर महानगरपालिकेच्या भाग – १ व भाग – २ या कामांकरीता किंमतीचे देकार, वस्तु व सेवा कराच्या किंवा इतर करांच्या दरामध्ये निविदा प्राप्त होण्याच्या दिनांकापासून आतापर्यंत झालेले बदल व कंत्राटीय कालावधीत आणखी बदल झाल्यास कंत्राटीय तरतुदीनुसार कंत्राटीय किंमतीमध्ये वेळोवेळी योग्य ते समायोजन करण्याच्या अधीन राहून, स्विकारण्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

| भाग. | निविदाकार | सादर आर्थिक देकार (GST वगळुन) (₹) | युटीलिटी शिफ्टींग (₹) | रॉयल्टी (₹) | एकूण (₹) |
|---|---|---|---|---|---|
| १. | मे.निखिल कंन्स्ट्रक्शन ग्रूप प्रा. लि. | ४८,२९,५७,४४४ | ३,८७,१३,९३९ | ७,७२,४७५ | **५२,२४,४३,८५८.७१ (निविदा रक्कमेचा दर )** |
| २. | मे.एन.ए. कंन्स्ट्रक्शन प्रा. लि. | ४६,२८,५३,२६८ | ३,७०,२८,१९५ | १७,४३,४०२ | **५०,१६,२४,८६५.०० (निविदा रक्कम वाटाघाटी पश्चात दर (AT PAR) )** |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१७ : प्राधिकरणाचे दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.</u>**

१७.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत कार्यकारी समितीस माहिती दिली.

१७.२ त्यानंतर प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेखांची नोंद घेऊन लेख्यांस कार्यकारी समितीने मान्यता दिली.

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*******